करामती बाळू

अनिल शिणगारे

या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

करामती बाळू

हे पुस्तक फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

तुम्ही ते फुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

करामती बाळू

(बालगोष्टीसंग्रह)

लेखक

अनिल शिणगारे

करामती बाळू

लेखक... अनिल शिणगारे

पत्ता - मु. पो. कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.
ई-मेल-anilshingare2674@gmail.com
फोन- 70203 53347

मुखपृष्ट व इतर चित्रे- निखिल शिणगारे (7249151626)

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com
esahity@gmail. com
Whatsapp: 9987737237
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

प्रकाशन : २ ऑक्टोबर २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे

लेखक परिचय-

अनिल शिणगारे

एम ए, डी. एड, बी. एड, डी. एस. एम.

जन्म-१ जून १९७४

नोकरी सुरु दि. ०१ /१९९७

नोकरी- २७ वर्षे शिक्षक – सुपात्रे, केखले, जाखले, दाणेवाडी, (जि. कोल्हापूर)

*****प्रकाशीत साहित्य-**

१)गोपाळांची पोरं (कादंबरी)

२)माणिकमोती (कथासंग्रह)

३) करामती बाळू (ई-बुक) (बालकथासंग्रह)

*****आगामी लेखन -**

१)कल्पनेच्या तीरावर (बालकथा)

२)गोपाळवाडी (कादंबरी)

पुरस्कार -

१)विनय कोरे राज्यस्तरीय शिक्षण भूषण पुरस्कार २०२३

२) शैक्षणिक व्यासपीठ मलकापूरचे वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार

३) राजर्षी शाहू फाऊंडेशनच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार

४) 'गोपाळांची पोरं ' या पुस्तकास बालकुमार साहित्य सभा कोल्हापूरचा उत्कृष्ट अनुभवकथन म्हणून पुरस्कार

अर्पणपत्रिका

शाळा आणि मुले हेच माझे दैवत मानून

त्यांच्या विकासासाठी अविरत धडपडणाऱ्या

माझ्या समस्त शिक्षक बंधू-भगिनींच्या चरणी...

मनोगत

'करी मनोरंजन जो मुलांचे
नाते जडेल प्रभुशी तयाचे'

असे साने गुरुजी म्हणत. लहान मुले म्हणजे देवाघरची फुले. त्यांचे जो मनोरंजन करील त्याचे परमेश्वराशी नाते जडेल असे म्हटले आहे. लहान मुले पटकन कोणत्याही गोष्टीकडे आकर्षित होतात. तेव्हा त्यांच्या हातात इसापनिती, पंचतंत्र, चांदोबा, किशोर, संस्कार कथा, नितीकथा, बोधकथा अशांसारख्या चित्रमय कथांची पुस्तके पडली तर त्या पुस्तकांना चिकटून राहतात. लहान वयात मुलांना वाचनाची गोडी लागली की ती दीर्घकाळ टिकून दिवसेंदिवस वाढत जाते. थोर शास्त्रज्ञ भारतरत्न माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिनाचे शाळेत आयोजन करुन पुस्तक वाचनाचे प्रयत्न जाणिवपूर्वक केले जातात. ज्या द्वारे मुलांनी जास्तीत जास्त पुस्तके वाचावीत हा उद्देश त्या पाठीमागे असतो.

मुले आजी-आजोबांना, गुरुजनांना, पालकांना गोष्टी सांगा म्हणून गोशा लावतात. त्या गोष्टी लक्षात ठेवून इतरांना सांगतात अशा गोष्टींतून ज्ञान, रंजन आणि संस्कार मूल्यांची रुजवणूक घडते. मुले सतत मोबाईल, संगणकावर गेम खेळत असलेली दिसून येतात. पालकांची त्या बद्दल तक्रार असते. परंतु सुरुवातीला मुलांचे मन रमावे म्हणून त्यांच्या हाती पालकांनीच मोबाईल सोपवलेले असतात. त्यापासून परावृत्त करण्यासाठी पुस्तक हे

प्रभावी माध्यम असते. अशा वेळी चांगली पुस्तके त्यांची ज्ञानवृद्धी करुन चिकित्सकवृत्ती वाढवण्याचे काम करत असताना पहायला मिळतात. मोबाईल, दूरदर्शन, संगणक यापासून मुलांना परावृत्त करणे आवश्यक असते. गोड बोलून त्यांना समजावून सांगितले तर मुले त्यापासून दूर होऊन आपल्या गुरुजनांनी सांगितलेल्या गोष्टी करतात. कारण पालकांनी कितीही सांगितले तरी त्यांच्यावर प्रभाव असणाऱ्या व्यक्ती जोपर्यंत सांगत नाहीत तोपर्यंत मुले ऐकत नसतात. यासाठीच सौ सुनारकी एक लोहारकी म्हटले आहे.

'करामती बाळू 'हे अशाच आज्ञाधारक मुलांचे पुस्तक आहे. ज्या छोट्या छोट्या मुलांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात घडणाऱ्या गोष्टी मला सांगितल्या आहेत. त्या आपल्यापर्यंत पोचवण्याचे काम केले आहे. त्यातून आपल्याला निखळ आनंद मिळेल अशी आशा वाटते... या ई - पुस्तकासाठी माझ्या मोठ्या मुलाने निखिलने विशेष प्रयत्न केले आहेत त्याचे मनापासून आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो... तसेच माझ्या कुटुंबातील पत्नी, आई, मुले या सर्वांनीच वेळ उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्यांचेही आभार...

धन्यवाद

अनिल शिणगारे

अनुक्रमणिका

१) बोलघेवडी तनिष्का

२) कावळ्याचा रंग

३) चिमण्या

४) करामती बाळू

५) वंदू आणि वानरं

६) ससुला

७) रॉकीची शाळा

८) जॅक आणि जिमी

९) गौरी

१०) पज्या

११) शंभू आणि चिमणीची पिल्लं

अनिल शिणगारे

बोलघेवडी तनिष्का

१ . बोलघेवडी तनिष्का

सकाळचे दहा वाजलेले. मुले सरांची वाट पहात थांबलेले. सर गाडीवरुन उतरले. मुलांनी धावतच जाऊन सरांना गराडा घातला. कुणी सरांचे हेल्मेट घेतले तर कुणी सरांची सॅक घेतली. चहूबाजूंनी प्रसन्न, हसतमुख चिमुकली मुले पाहून सरांची तहानभूक हरपली. प्रसन्नपणे हसत सर मुलांच्यासोबत वर्गाकडे चाललेले. वर्गाचे कुलूप काढतानाच तनिष्का सरांना म्हणाली,

"सर, काल काय गंमत झाली सांगू?"

"हं, सांग"

"मम्मी चुलीवर तीळ भाजत हुती. आजी खाली बसली हुती आणि दिदी खुर्चीवर बसली हुती, मी फराक वर करुन म्हणलं,

“ मम्मे, मला किती लागलंय बग की गं"

"कळत न्हाय ?, बगून चालाय येत न्हाय? दुसरीला हाईस न्हवं? म्हणून मम्मी झाडू घिऊन माज्या पाटीमागं लागली."

सरांनी तिच्या नकलेला जोरदार हसून दाद दिली. तसा तिला आणखी एक प्रसंग आठवला

" दिदी भात कालवत हुती. भात खाताना ताटातनं बाॅट नाचवत हुती ती बगून मम्मी म्हणली,

नाचाय लागलीयस ताटात?, गप जेवाय येत न्हाय? मम्मीच्या भ्यानं दिदीनं बकाबका भात खाल्ला".

असेच दुसऱ्या दिवशी तनिष्का शाळेत आल्या आल्या सरांना सांगू लागली.

"सर, मी दिदीला दोन चिमूटं घेटलंत"

" का बरं?"

" आंगूळीला जायला मी तयार हून बसलीती आणि ही माज्या अगूदर जाऊन बसली ".

" मग काय झालं? तिला लवकर शाळंत जायाचं आसंल"

" मग मी लवकर उटून आंगूळीसाटी बसलीती ती"

दिवाळीची सुट्टी संपून चार दिवस न आलेली तनिष्का आलेल्या दिवशी सरांना म्हणते कशी,

" हाय सर"

" अं, तू आज आलीयास व्हय?, चार दिवस झालं शाळा सुरु होऊन "

" मामाच्या पोराचं बारसं हुतं. तिकडं पुण्याला गेल्तो "

" अस्सं व्हय?"

" सर, दिवाळीच्या दिवशी चिटपुट उडीवताना नेहाच्या फराकमधीच गेलं"

"हा ड्रेस कसला तुझा?"

'प्लाजो ड्रेस हाय '

"किती रुपयला ?"

" हजार रुपयचा ड्रेस दुकानदार काकांनी दीडशे रुपयला दिला"

" अरे व्वा छानच आहे मग "

" सर' आमच्या आत्तीनं मेंढरं आणल्यात'

"का बरं? "

"पाळायला"

"सर, आमच्या दिदीची उंची वाढणार न्हाय, माजी वाडणार, मी आता तिच्या हिथंपर्यंत लागतूय "

" सुट्टीत मी चिमण्याच्या वाढदिवसाला निगालो हुतो. कुरकुरे खाईत उड्या मारत निगालतो. शेजारचं तात्या म्हणलंत, पाय काय वाकडं झाल्यात व्हय?"

" व्हय का?" हसून सर म्हणाले.

" चिमण्याच्या घरात गेलो. तर त्येंच्यात आल्याली पावणी मोठ्ठ्या माणसासारखी बोलत हुती, एवडया लवकर काय झेंडा लावाय आलायसा? "

" व्हय का?"

" आणि काय झालं सांगू? "

" हं सांग की "

" आमच्यात याक कूळ ऱ्हायाला आल्तं. तीन दिवस ऱ्हायलं आणि एक्कावन हजार रुप्पय घिवन पळून गेलं "

" एक्कावन हजार?, तुमचं पैसे न्हेलंत? "

" न्हाय, बाळू दादांचं, त्येंच्यात कामाला ऱ्हाणार हुता "

" तुमाला कवा कळलं? "

" बाळू दादाचा मोठ्ठा भाव रात्री अकरा वाजता आमच्या घराकडं आल्ता. आमच्या आज्जीला उठवून गडी हाय का बगाय लावलं. आज्जीनं भाईरनं बगीतलं तर तशीच आतनं कडी घालून पसार झाल्याला. आज्जीन आतनं जावन कडी काडली तर हायत कुटं कोण?"

" एकटाच हुता? "

" न्हाय, चौगंजण हुतीत, ती दोगं नवरा बायकू, दोन पोरं. योक दुसरीला आनं योक पाचवीला हुता "

" तुमचं काय न्हेलं काय?"

" आमचं काय न्हाय, तीन दिवसाचं तीनशे रुपये बुडलं "

" आरारं, फार्फार वाईट झालं "

" बाळू दादाचा भाव म्हणलाय घावला की तुमच्या घराकडं फोडत आणणारा "

" हो का? "

" मग, तसं सोडणार न्हाय त्येला म्हणालाय "

" सर, आणि एक गमजा सांगू काय झाल्याली? "

" सांग की "

" एगदा मी दिदीबरुबर सायकल फिरवीत हुतो. रस्त्याच्या वळणावर एक माणूस मदीच रस्त्यावर बोलत हुभारल्याला. तिकडनं मी सायकलवरनं जोरात आल्याली. त्यो माणूस आडवाच उभा राह्यल्याला. 'बाजूला व्हा, बाजूला व्हा' म्हणून दिदी जोरात वराडली. त्यो माणूस, 'थांब थांब' असं तिला म्हणला. तेवढ्यात माजी सायकल त्याच्या दोन्ही ढेंगातून फुडं गेलेली. त्यो माणूस सपशेल उताना पडला. त्येच्या डोक्याला जखम

झालेली. माज्या खिशात आईनं दिलेलं दहा रुप्पंय खायला घ्यायला दिलेलं. ती मी त्या माणसाला दिलंत आन म्हणलो,

जा, बाबा डिरसिंग कर जा आणि जा तुज्या वाटंनं "

त्यो म्हणला माजी गुणाची, गुणाची पुरगी"

"सर, आणि एक गमजा सांगू काय झाल्याली?"

"सांग"

"मी आणि दिदी उन्हाळ्यात आंबा खायायलोतो मग क नाय दिदीला रसाच्या मिशा आल्या. मग मी दिदीला म्हटलं,

'दिदे मिशा आल्यात"

"काळ्या काय?"

"न्हाय, आंब्याच्या, मग दिदीनं ताँड पुसलं. तोंडाचा चंबू करुन पा पा करु लागली. तेवढ्यात आमच्या कोंबडया आल्या आन एक कोंबडी दिदीला टोचून खुरुड्यात गेली."

" हो का?, अरेरे "

" मी पहिलीत हुतो तवा काय झालं सांगू? "

" मी आणि दिदी रानात गेल्तो. आणि तिथं एक बाई थांबल्याली. दिदी शेंगाचं गटुळं उचलत हुती. तिला ती उचलत नव्हतं. थांबल्याली बाई म्हणली,

"उचलू लागू काय?"

दिदी म्हणली, लागा

आणि दिदी पोत्यासंगं खड्यातच पडली. मग क नाय मी दिदीला उटीवली आणि आमच्या रानाशेजारच्या घरात नेली. तिथल्या काकांनी अननसच्या फोडी दिल्या. मी खाल्ली आणि दिदीच्या फोडीवर चटणी टाकली. मला माहित हुतं तिला तिखट खपत न्हाय. ती तिला दिली आणि तिला म्हणालो, तुझं स्पेशल

मग दिदीनं अर्धी फोड खाल्ली आणि क नाय दिदी नाचायच लागली. "

दिवाळीच्या सुट्टीत घडलेल्या सर्व हकिगती तनिष्कानं तिखटमीठ लावून सरांना सांगीतल्या. तिच्या सगळ्या हकिगती त्यांनी शांतपणे, कधी हसून दाद देत तर कधी गंभीर चेहऱ्याने ऐकून घेतल्या.

अशी ही बोलकी, बडबडी तनिष्का सरांची लाडकी विद्यार्थीनी होती. कुणाला सांगू नका म्हणून सरांना खडानखडा सांगून मोकळी

व्हायची. खूप गुणी आणि चाणाक्ष होती. सगळीकडे तिचे बारकाईने लक्ष असत.

तनिष्का आपली मोठी बहिण, आई, आणि आजीसह रहात होती. ती दुसरीत शिकत होती. तनिष्का फार बोलकी होती घरात, गावात काय घडेल त्याची इत्यंभूत माहिती ती तिच्या मैत्रिणींना आणि शाळेत गेल्यावर सरांना देई. घरातील सगळी लाडाने तिला तायडी म्हणत.अभ्यासात ती फार हुशार होती. सांगीतलेला सर्व अभ्यास ती वेळच्या वेळी करत. तिचे वडील ती लहान असतानाच वारले होते. त्यामुळे मुलींचा सांभाळ तिची आई आणि आजी करत होती. तिची आई साड्यांना पिको फाॅल करत. आजी दुसऱ्यांच्या शेतात कामाला जात. ती खूप कष्टाळू होती. तिने एक म्हैस आणि कुत्रा पाळलेला. रोज सकाळी उठून ती म्हैशीला चारापाणी करत. दूध काढत ते डेअरीत घालत. नातीला उठवून अंघोळ पाणी घालत. तिला जेवायला वाढत आणि ती दुस-याच्या शेतावर कामाला जात. तनिष्काची शाळा घरापासून दूर होती. ती दररोज चालत शाळेत जात. तिची दिदी नववीला होती ती बसमधून शाळेत जात. तिलाही वाटतही आपणही शाळेला बसमधून जावं. तनिष्काच्या वर्गातील इतर मुले आपल्या वडीलांच्या, आजोबांच्या गाडीवरून शाळेला जात. तनिष्काला दररोज पायपीट करत चालत जावे लागत. तिलाही वाटायचे माझे बाबा असते तर

मलाही ते सोडायला आले असते. मी गाडीवर पुढे रुबाबात बसले असते. बाबांनी मला खाऊ घेऊन दिला असता. मी गाडीचा हाॅर्न पाँम, पाँम वाजवला असता.

तिला असं वाटायचा. तेव्हा ती आजीला विचारत,

"पप्पा कुठायत गं?"

"ते लांबच्या गावाला गेल्यात. येताना तुला खाऊ आणणार हाईत"

" कधी येणार गं सांग ना? '

असे ती म्हणताच मात्र तिच्याकडे कोणतेच उत्तर नसत, तिचाही तिच्या आजीवर खूप जीव होता. संध्याकाळी आजी शेतातून घरी आली की ती पाणी देत, तिचे हातपाय दाबत. आपल्या एवढ्याशा नातीची माया पाहून तिला भरून येत. तिची आजी तिला शाळेत लागणारे सगळे घेत.

एके दिवशी ती आजीसोबत म्हैशीला चारा आणायला गेली होती. आई आणि दिदी मामाकडे गेलेली. आजीने गवत कापले. त्याचा भारा

बांधला आणि डोक्यावर उचलून घेऊ लागली. तितक्यात तिला चक्कर आली नी ती तिथेच बेशुद्ध होऊन पडली. आजी पडलेली पहाताच रस्त्याच्या कडेला खेळत बसलेल्या तनिष्काचे लक्ष आपल्या आजीकडे

गेले. ती धावतच तिच्याजवळ गेली "आजी, आजी" म्हणून मोठमोठ्याने हाका मारल्या. तरी तिची काहीच हालचाल झाली नाही. तेव्हा ती रस्त्यावर आली आणि येणाऱ्या जाणाऱ्या गाड्यांना, माणसांना, 'आमच्या आजीला काय झालंय बगा की' म्हणू लागली. तिच्या आवाजाने गावातील परिचयाचे धावून आले. त्यांनी तनिष्काच्या आजींना ताबडतोब चारचाकी गाडी आणून दवाखान्यात नेले. त्यांना सलाईन लावण्यात आले. तासाभराने तिने डोळे उघडले. ती शुद्धीवर आली.

"हालचाल करु नका. शांत झोपून रहा" म्हणून डॉक्टरांनी सांगीतले. परंतु आजीचा जीव नातीत अडकलेला., "माझी नात कुठाय?" असे तिने विचारले. ती सोबतच आलेली. रडून रडून तिचे डोळे सुजलेले. डॉक्टरांनी सांगीतलं "वेळेवर तुम्हाला दवाखान्यात आणले म्हणून बरे झाले, नाहीतर काही खरे नव्हते.तुमच्या नातीमुळे तुमचा जीव वाचला" आजीने नातीला जवळ घेऊन पटापट पापे घेतले. दोघी एकमेकींना अश्रूंचा अभिषेक करत होत्या.

कावळ्याचा रंग

२ . कावळ्याचा रंग

एक होता कावळा. रंगाने काळा असलेल्या कावळयाला सगळे काळ्या काळ्या म्हणून चिडवायचे. त्याला काळ्या म्हटले की खूप राग यायचा. परंतु रंगावरुन कुणाला हिणवू नये असे त्याला वाटत. तो शाळेजवळच्या झाडावर रहायचा. तो दररोज शाळेत येणारी पांढऱ्या शुभ कपड्यातली मुले पहात. तेव्हा त्याला ती मुले खूप आवडत. तो एकटक तासनतास त्या मुलांकडे पहात रहात. त्याला वाटत आपलाही रंग पांढरा असता तर ? असा विचार त्याच्या मनात आला. लाकूडतोड्याला देवीनं हरवलेली कुऱ्हाड आणून दिली तशी देवी मी मागेल ती इच्छा पूर्ण करेल असा विचार त्याच्या मनात आला. परंतु तो कावळा नवीन तंत्रज्ञान जाणणारा होता. त्याने तो विचार धुडकावून लावला. ती निव्वळ अंधश्रद्धा आहे म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले.

शाळेशेजारी एका चित्रकाराचे दुकान होते. तो दररोज त्याची चित्रे पहायचा, तो कुत्रा, मांजर, मोर, पोपट, कावळा, चिमणी आणि देवदेवतांची चित्रे काढायचा. कावळ्याला खूप कुतूहल वाटायचे.तो त्याला हवे तसे चित्र काढायचा. त्याची रंगसंगती त्याला खूप आवडायची. तो त्याला

म्हणाला, " दादा मला पांढरा रंग देशील का? तो चित्रकार म्हणाला, "देईन ना, पण - एक हजार रुपये घेईन" तो म्हणाला, "देईन की पण आता मी माझे एटीएम घरी विसरून आलोय, फोन पे केले तर चालेल का?"

"चालेल की "चित्रकार म्हणाला. लगेच चित्रकाराने कावळ्याला पांढरा रंग दिला. पांढराशुभ्र कावळा पाहून सगळे

'तो बघा पांढरा कावळा' असे म्हणू लागले. ते त्याला फार आवडत. सगळे लोक त्याच्याकडे कुतूहलाने पहात. आपल्या पांढऱ्या रंगाचा त्याला खूप अभिमान वाटू लागला. शाळेतील मुलेही त्याच्याकडे एकामका पहात. एकदा तो फिरत फिरत शहरात डी मार्टला खरेदीला गेला होता. तेव्हा त्याने एका ठिकाणी सगळ्या दोनचाकी, चारचाकी गाड्या थांबलेल्या दिसल्या. खूप लांबपर्यंत गाड्यांची रांगच रांग लागलेली. शहरातील चौकातील लाल दिवा पाहून सगळे थांबलेले. त्याला तो लाल रंग खूप आवडला. कारण त्याला सगळे घाबरतात. माझा रंग लाल असता तर??? मलाही सगळे घाबरले असते.

तसाच धावतपळत तो चित्रकारकडे गेला आणि म्हणाला, "दादा मला लाल रंग देशील ? "

"देईल की पण यावेळी मी दोन हजार रुपये घेईन."

"दादा, पहिल्यावेळी एक हजार आणि आता दोन हजार?, हे काय बरोबर नाही हं"

"दीड हजारात तुला परवडत असंल तर बघ नाही तर चालायला लाग."

"त्याखाली एक रूपया घेणार नाही" असे त्याने सांगितले. कावळ्याने विचार केला. त्याच्या खात्यात नुकताच पगार जमा झाला होता. टिंग टिंग मेसेज वाजला होता. दहा हजार रुपये त्याच्या खात्यात होते. पण घर खर्चाला पैसे वाढत्या महागाईत पुरत नव्हते. दूधबील, पेपरबीर, गॅस, लाईटबील, घरभाडे कसे बसे भागत. पण ते काही नाही शेवटी जगायचे तर स्टेट्सने. पैसे काय आपणच मिळवणार हाय. असा तो मनाशी विचार करत होता. तेवढ्यात चित्रकार म्हणाला,

"अरे, कावळेदादा काय झालं ?"

"ठीक आहे, चालेल"

चित्रकाराने लगेच लाल रंगाची डबी काढली आणि कावळ्याला हवा तसा रंग दिला. त्याने समोरच्या आरशात पाहिले. स्वतःच्या रूपाकडे पाहून तो मनोमन खुश झाला. तो तिथून बाहेर पडला. लाल रंगाचा कावळा पाहून सगळे आश्चर्याने त्याच्याकडे पाहू लागले. त्याला आपल्या रूपाचा हेवा वाटू लागला. त्याचा लालभडक रंग पाहून शहरातली मुलं शाळेत

जाता जाता आश्चर्यचकित होऊन त्याच्याकडे पहात. माझ्यासारखा मीच अशा तोऱ्यात तो वावरत. पण गर्वाचे घर कधी ना कधी खाली होते. तसेच त्याच्या बाबतीत लवकरच घडले.

पावसाळ्याचे दिवस आले. मुसळधार पाऊस पडू लागला. सगळीकडे हिरवेगार गवत दिसू लागले. झाडे, पिके, गवत, सगळी सृष्टी आनंदाने डोलू लागली.

लोक हिरवागारे निसर्ग पाहून शहरातील निसर्गरम्य परिसर पहायला येऊ लागले. कावळा शाळेशेजारी रहात होता. तिथला परिसर निसर्गरम्य असल्याने पिकनिक पॉइंट होता. तिथे सगळे मोबाईलने फोटो काढत सेल्फी काढत, शुटींग करत. सगळे हसत खिदळत हिरव्या निसर्गातील हिरवाईचा मनमुराद आनंद लुटत. ते पाहून कावळ्याला वाटू लागले. आपला रंग हिरवा असता तर? त्याच्या मनात असा विचार आला. आणि चांगल्या कामाला दिरंगाई कशाला? म्हणून तसाच तो चित्रकार दादाकडे गेला,

"दादा,"

' अं, आता आणि काय? आता कुठला रंग द्यायचाय?, कशाला उगाच पैसे वाया घालवतोयस?"

कावळ्याला त्याचा रागच आला. माझे पैसे आहेत, काम फुकट करतोय का?त्याच्या मनात विचार आला. पण त्याला म्हटलं तर

आपल्याला हवा तो रंग देणार नाही. दुसरीकडे गेलो तर दुप्पट, चौपट पैसे घेतील. त्यापेक्षा हाच बरा. तो त्याला म्हणाला,

" दादा, मला हिरवा रंग देशील?"

"दोन हजार घेईन, परवडत असलं तर बघ नाहीतर चालायला लाग"

"" गेल्यावेळी दीड हजार, आणि आता दोन हजार? "

"महागाई वाढलीय, रंग महाग झाल्यात "

"एवढं लगेच वाढल्यात का?"

"हे बघ तुला परवडत असले तर बघ नसलं तर जा. माझ्यासारखं तुला कोण जवळपण उभं करू देणार नाही "

कावळ्याला हे पटलं. कारण त्याला दुस-या कुणाची ओळख नव्हती..

" ठीक आहे"

म्हणून त्याने पाकिटातले पैसे काढले आणि मोजून दिले. चित्रकाराने हिरवा रंग अचूक दिला. तो पाहून कावळा सुखावला. सगळे या प्रयोगशील कावळ्याचे कौतुक करत. ते कावळ्याला खूप छान वाटत.

कावळा एकदा आपल्या रहात असलेल्या परिसरातून फिरत होता. तेव्हा तिथे त्याला एक काळा कभिन्न दगड दिसला. वर्षानुवर्षे तो तिथंच जसा होता तसाच. दिवसांमागून दिवस जात होते. ऋतूमागून ऋतू. परंतु

त्याच्यामध्ये अजिबात बदल झालेला नव्हता. उलट त्याला आपल्या रंगाचा अभिमानच वाटत होता. कावळ्याला त्याचा हेवा वाटला. आपण सरड्यासारखा रंग बदलत गेलो. तो मात्र आहे तसाच. आपल्यावर कुणी विश्वास ठेवेल का ? पक्षी असो, प्राणी असो आपला आपल्या क्षमतेवर विश्वास असला पाहिजे. तशीच दृढ इच्छाशक्ती आणि निष्ठा असावी. सतत बदलण्यात काहीही अर्थ नसतो.

अनिल शिणगारे

चिमण्या

३ . चिमण्या

एके दिवशी शाळेतील तिसऱ्या इयत्तेत शिकत असलेल्या बाळूला चिमण्या म्हणाला, 'तू भाकरी कशी मुडतूस?, हात कसं धुतूस? पेला कसा धरतूस?'

बाळूला एका हाताची बोटे नव्हती. आजपर्यंत हा प्रश्न बाळूला कुणीच विचारलेला नव्हता. चिमण्याची तक्रार घेऊन तो सरांकडे गेला परंतु सरांना त्याच्या कुतूहलाचे, चिकित्सकवृत्तीचे कौतुक वाटले. अकरा वाजता प्रार्थना झाली, परिपाठ झाला. सगळी मुलं वर्गात आली. सरांनी फळ्यावर वार, दिनांक, सुविचार लिहिला. तेवढ्यात मुलांच्या तक्रारी सुरु झाल्या.

"सर, चिमण्यानं वर्गात माती टाकली"

"ह्यो मला चिडीवतोय"

"सर, चिमण्यानं चिवडा खाऊन बेंचखाली घाण केलीय बगा"

"सर, चिमण्यानं माज्या पाटीत बुक्की मारली बगा"

"सर, माजी ईनी वडली बगा,

माजी बाटली पाडली, केस ओढले, पाटी मारली, पान फाडलं"

"सर, चिमण्याचा अभ्यास?"

" त्येनं न्हाय केल्याला"

" सर, चिमण्या माझ्या अंगावर पडाय लागलाय बगा 'पोपट म्हणाला

"अं, काय झालंय ?, चिमण्या अभ्यास केला नाहीस?" चिमण्या गालात हसत नेहमी मार खायच्या तयारीत.

सवयीने सरांनी चिमण्याच्या जागेकडे बघितले आणि वर्गातील मुलांवरुन नजर फिरवली. चिमण्या कुठेच दिसत नव्हता. खोडकर, हसतमुख, दररोज शाळेत येणारा, कधीही शाळा न बुडवणारा चिमण्या कुठं गेला असेल? आजारी असेल का? असे एक ना अनेक प्रश्न त्यांच्या मनात आले.

चिमण्या दुसरीत शिकत होता. अवखळ चिमण्या शाळेतील सर्व मुलांच्या खोड्या काढत. तब्बेतीने किरकोळ असणारा चिमण्या खूपच खोडकर होता. सतत कुणाची ना कुणाची खोडी काढून मार खात. परंतु त्याचा चेहरा सतत हसरा असत. तो फार निरागस होता. चिमण्याचे खरे नाव विराज होते. परंतु त्याच्या घरातील सगळी त्याला लाडाने चिमण्या म्हणत. त्यामुळे शाळेतील सर्व मुलेही त्याला चिमण्याच म्हणत. चिमण्या चिकित्सक आणि हजरजबाबी होता. अभ्यासात तल्लख असणारा चिमण्या शाळेत सांगितलेला गृहपाठ कधीही करत नसत. परंतु तरीही त्याचे

सर त्याला कधीही मारत नसत. कारण त्याला मारण्यासाठी सरांनी हात उगारला तरी तो हसत. त्यामुळे त्याचा निरागस चेहरा पाहून सर "उद्यापासून अभ्यास नाही केलास तर मार खाणार हं" म्हणत. परंतु तो सरांचा उद्या आणि चिमण्याचाही अद्याप उगवलेला नव्हता. चिमण्या सर्वांचा लाडका होता. तोच चिमण्या चार दिवसांपासून शाळेत आला नव्हता.

चिमण्या आणि पोपट सख्खे चुलतभाऊ होते. दोघेही दुसरीत शिकत होते. चिमण्याचा मोठा भाऊ तिसरीत शिकत होता तर चुलत बहिण चौथीत शिकत होती. चारही भावंडे मराठी शाळेत शिकत होती. जोडवर्ग असल्यामुळे चिमण्या, पोपट आणि ईश्वरी तिघे सरांच्या वर्गात होती. तर चिमण्याचा मोठा भाऊ आरव मॅडमच्या वर्गात होता. चिमण्याची शाळा द्विशिक्षकी होती. तीस पट शाळेचा होता. डोंगराच्या कुशीत निसर्गरम्य परिसरात शाळा जोतिबाच्या रस्त्यावर एक किलोमीटर अंतरावर होती.

चार दिवस चिमण्या शाळेत आला नव्हता. सरांनी मुलांना विचारले,

"अरे, चिमण्या कुठं आहे?

" चिमण्याला दवाखान्यात नेलंय, त्याचं ऑपरेशन केलंय?

चिमण्याच्या चुलत भावंडांनी सरांना सांगीतले.

चिमण्या शाळेत आला नसल्यामुळे मुलांना त्याच्याशिवाय करमत नव्हतं. चिमण्याचा तिसरीतला दोस्त हर्षवर्धननं दुपारचा डबाही खाल्ला

नव्हता. त्याला दिवसभर चिमण्याची आठवण येत होती. त्याला त्याची सारखी आठवण येत होती. त्याने शाळेच्या फळ्यावर लिहिले, "चिमण्या तुज्याशिवाय गमत न्हाय, तू कवा येणार?"

शाळेतील सर्व मुले त्यादिवशी चिमण्याच्या घरी गेली. चिमण्याच्या चुलतीला दवाखान्यात त्याला फोन लावायला मुलांनी सांगीतले. त्यांनी दवाखान्यात चिमण्यासोबत असणा-या त्याच्या आईला व्ही डी ओ काॅल केला. सलाईन लावलेल्या चिमण्याला पाहून सर्व मुलांना रडूच कोसळले आणि शाळेतल्या आपल्या जिवलगांना पाहून चिमण्याही मोठ्याने रडू लागला. त्यादिवशी संध्याकाळी कुणीही मुलं जेवली नाहीत.

तिस-या दिवशी संध्याकाळी चिमण्याला दवाखान्यातून डिस्चार्ज मिळाला.शाळेतील मुलांनी पाच पाच रुपये काढून चिमण्याच्या स्वागताची जय्यत तयारी केलेली. चिमण्याच्या घराची खोली फुगे, थर्माकोलने सजवली. त्याच्यासाठी कॅडबरी, चॉकलेट्स, बिस्किट पुडे, कुरकुरे असा खाऊ नेलेला. सगळेजण मिळून चिमण्याची वाट पहात थांबलेले. साडेसहा वाजता चिमण्याला घेऊन मोठ्या चारचाकी गाडीतून त्याचे आईवडील आले. घरासमोर गाडी उभी राहिली. त्याचे वडील गाडीतून उतरले.

गाडीभोवती मुलांनी चिमण्याला पाहण्यासाठी गर्दी केली. त्याच्या आईने चिमण्याला दोन्ही हातानी उचलून घेतले आणि त्या गाडीतून उतरल्या.

"चिमण्या, चिमण्या" मुलांनी एकच गलका केला. मुलांच्या गलक्याने झोपलेला चिमण्या जागा झाला. मुलांच्याकडे पाहून चिमण्याने स्मित केले. निम्मी मुले धावत चिमण्याच्या घरात सजवलेल्या खोलीत गेली. चिमण्या आत येताच मुलांनी त्याच्या अंगावर फुले टाकून त्याचे स्वागत केले. चिमण्याला सर्व सवंगड्यांना पाहून खूपच आनंद झाला. चिमण्याला सोफासेटवर झोपवण्यात आले. डॉक्टरांनी चिमण्याला महिनाभर हालचाल करायची नाही म्हणून सांगीतलेले. परंतु कडमड्या चिमण्या त्यांचे थोडेच ऐकणार?

दुस-या दिवशी मुलांनी शाळेत गेल्यावर सरांना सांगीतलं. "चिमण्याला दवाखान्यातनं आणलंय"

" हो का?' मी आज बघायला जाईन शाळा सुटल्यावर"

"सर, आम्हीपण येणार तुमच्याबरोबर" सर्व मुलांनी एकच गलका केला.

" ठीक आहे, ठीक आहे. आपण सगळे मिळून पाच वाजता जाऊ "

शाळा सुटली आणि त्यादिवशी पाच वाजता जोरदार पाऊस पडला. त्यामुळे सरांनी चिमण्याला बघायला जायचे रद्द केले.

शनिवारी शाळा सकाळची होती शाळा सुटल्यावर बारा वाजता सर मुलांच्यासोबत चिमण्याला पहायला गेले. कॅडबरी, बिस्किट, चॉकलेट घेऊन सर गेले होते. सर पहायला आलेले पाहून चिमण्याला खूप आनंद झाला. "जराही हालचाल करू नकोस, लवकर बरा होऊन शाळेत ये, तुझ्याशिवाय करमत नाही" असे सर चिमण्याला म्हणाले.

"मी उदयापस्नंच शाळंत येणार " चिमण्या म्हणाला

"ठीक आहे ये हं"

तेव्हा त्याच्या आईने डॉक्टरांनी चिमण्याला महिनाभर विश्रांती घ्यायला हवी म्हणून सांगितले आहे असे सांगितले. तसे सरांनी चिमण्या लवकर बरा हो आणि लवकरात लवकर शाळेत ये असे सांगितले. तेव्हा चिमण्याने मान हलवून होकार दिला. चिमण्याच्या आईने चिमण्याचे ऑपरेशन केलेला शरीराचा भाग दाखवला. फारच मोठे ऑपरेशन झाले होते. त्याला विश्रांतीची सक्त गरज होती. परंतु चिमण्या स्थिर कसा बसेल याची चिंता त्याच्या आई वडील आणि सरांना लागलेली..

करामती बाळू

४ . करामती बाळू

शाळेच्या पहिल्या दिवशी आवर्जून दांडी मारणारा बाळू आज्ञाधारक होता. मुलांना त्याची गैरहजेरी जाणवण्याचे कारण म्हणजे शाळेतील सर्व कामात तो पुढे असत. कुलूप काढण्यापासून झाडलोट करणे, पाणी भरणे, झाडांना पाणी घालणे,पाण्याची टाकी स्वच्छ करणे. बाळ्याला शाळेबाहेरची कामे खूप आवडत. अभ्यास म्हटला की कंटाळा. दिवाळीच्या सुट्टीनंतर पहिल्यादिवशी अभ्यास केला नाही म्हणून सर मारणार ही त्याच्या मनाची खात्री झालेली. बाळू कधी शाळेला येणार आणि कधी नाही ते अनुभवाने सरां ना माहित झालेले. दहा अकरा वर्षांचा बाळू. हजेरीतले नाव अथर्व परंतु सगळे बाळू म्हणत. बाळूपेक्षा सगळे बाळ्या म्हणून बोलावत. तब्बेतीने सशक्त आणि उंच होता. बुधवारी बिगर ड्रेस असला की अंगातील सदऱ्याच्या बाहया नेहमी आकडलेल्या. बाळूच्या उजव्या हाताला मधली तीन बोटे नव्हती परंतु त्याला त्याची कमतरता अजिबात जाणवत नव्हती.त्यांच्याशिवाय जगण्याची त्याला सवय झालेली.

बाळू शाळेला आला नव्हता म्हणून त्याच्या वडीलांना सरांनी फोन केला,

"बाळू कुठं गेलाय?"

"का? शाळेला आल्याला न्हाय"

"नाही ना, कुठं आहे बघा आणि पाठवून द्या बरं"

"बर ,फोन करून कुठं हाय बगतो आणि सांगतो"

"ठीक आहे"

थोड्या वेळाने बाळूच्या वडलांचा फोन आला,

"बाळू घरात न्हाय, कुटं भाईर गेलाय"

"बर ठीक आहे उद्या तर पाठवून द्या"

"उद्या मीच घिवनं येतो"

शाळेत जातो म्हणून सांगून बाळू रस्त्याच्या पलीकडे असलेल्या मुलांच्यासोबत खेळत बसलेला. त्याची आई शेतात गेलेली. वडील कामावर गेलेले आणि आजी जनावरं घेऊन हिंडवायला गेलेली. बाळूची मोठी बहीण आणि भाऊ शाळेत गेलेली.

दुसऱ्या दिवशी बाळू वडीलांबरोबर शाळेत आला. सरांना पाहून वडीलांच्या पाठीमागे लपू लागला, तसे सरांनी त्याला जवळ घेतले आणि प्रेमाने समजावले तसा गडी खुश होऊन जवळ आला. सुट्टीत घडलेल्या गंमतीजमती सांगू लागला. सरांनी 'होय मी सुद्धा धडा शिकवताना, "आईचं काम असले तर आई तुम्हाला कसे बोलावते" विचारले. बाळू म्हणाला,

"मी खेळायला गेल्तो आयनं घरातनं हाक मारली, ए बाळ्या दुकानातनं ये जा"

"मी न्हाय जा"

"ईतूस का हिकडं ?न्हायतर तिथं ईवून चोपीन"

बाळूच्या या प्रसंगावर सरांच्यासह सगळे मनमुराद हसले.

त्यादिवशी पाच वाजता शाळा सुटली. बाळू घराशेजारच्या प्रगतीसोबत घरी चाललेला. शाळेपासून थोड्या अंतरावर बांधकाम चालू होते. तिथे गेल्यावर बाळू म्हणाला,

"हिथं दारुडी मान्स हाईत तुला धरुन न्हीतील चल, चल लवकर"

"चल बाबा" प्रगती म्हणाली. तिथून थोडे पुढे गेल्यावर एका वळणावर मोठ्ठा खड्डा काढलेला होता. बाळू त्यातून उडी मारून पलीकडे गेला आणि प्रगतीला म्हणाला, "हिथं भूत हाय बग, तुला खाणार"

भूत हाय म्हटल्यावर प्रगती तिथंच थांबली आणि रडू लागली. पुढे येईनाच तसा

" न्हाय भूत, उगंच म्हंडलं, चल चल"

म्हणून बाळूनं तिची समजूत काढली.

तिथून ते पुढे गेलीत. पुढे दुसरीतल्या दुर्वांचा जनावरांचा गोठा लागला. तो खूप चढावर होता. बाळू प्रगतीला म्हणाला,

" हिथ चढायला ईल का तुला?"

"येतय" म्हणत ती कशीबशी चढली. बाळूपण चढला. तेवढ्यात प्रगतीचं पप्पा आलंत. त्यांना पाहून बाळू घाबरला. कारण प्रगतीला तिथं भूत हाय म्हणून भ्या दाखवलेले तिनं पप्पांना सांगीतलं तर तिचं पप्पा आपल्याला मारतील म्हणून तो खूप घाबरलेला. परंतु प्रगतीनं पप्पांना काही सांगीतलं नाही. अशा गमतीजमती करत बाळू शाळा सुटल्यावर मुलांच्या खोड्या काढत, त्यांना सांभाळून घरी नेत.

बाळू लहान होता तेव्हाचा प्रसंग दिवाळी दसरा सण जवळ आला होता म्हणून त्याच्या आईने चादरी, वाकळा धुण्याचे ठरवले होते. एके दिवशी बाळूचे वडील, आई, भाऊ मिळून गावाबाहेरील तलावावर कपडे धुण्यासाठी दुचाकीवरुन गेले होते. आई - वडील कपडे धुवत होते. गाडी रस्त्याच्या कडेला लावलेली. बाळूचा भाऊ झाडाच्या सावलीत बाजूला खेळत होता. बाळूचे लक्ष गाडीकडे गेले. किल्ली गाडीला तशीच. तो गाडीवर चढला आणि बटण सुरू केले. तशी गाडी सुरु झाली आणि धावू लागली. गाडी रस्त्याच्या कडेला असलेल्या दगडाला धडकली. त्यावर बसलेला बाळू ओढ्याच्या पाण्यात पडून गटांगळ्या खाऊ लागला.

बाळूचा भाऊ मोठ्याने ओरडला, "बाळ्या पडला " बाळूच्या वडलांचे लक्ष त्याच्याकडे गेले. त्यांनी धावतच जाऊन त्याला पाण्यातून बाहेर काढले. बराच वेळ झाल्यामुळे तो बेशुद्ध झालेला. त्याच्या पोटावर दाबून त्यांनी पोटातील पाणी बाहेर काढले. तेव्हा बाळू शुद्धीवर आला. परंतु तोवर सर्वांचीच पाचावर धारण बसलेली.

असेच एके दिवशी बाळू, त्याची बहिण, शेजारची मुले त्यांच्या घरात खेळत होती. आदल्या रात्री त्यांनी सैराट सिनेमा पाहिला होता. ते पाहून त्यातील नटाप्रमाणे ते उड्या मारायचा प्रयत्न करत होते. बाळूही तसाच उड्या मारायचा प्रयत्न करत होता. उडी मारताना बाळूची उडी विळतीवर पडली. अंगात जिन्सची पँट असल्यामुळे त्याच्या लवकर लक्षात आले नाही.थोड्या वेळाने पँट कशाने भिजलीय ते पाहू लागला. तर त्याचा हात रक्ताने भिजला. पँट काढली तर गुडघ्यावर चिरले होते. एवढे कापल्यानंतर एखादे जोरजोरात रडले असते परंतु बाळूने ऊ की चू केले नाही. त्याची बहीण रडू लागली. बाकीची मुलं घाबरली. परंतु त्यानंतरही बाळूला वेदनेची जाणीव नव्हती. त्याला शेजारचे दत्ता काका दवाखान्यात नेऊ लागले. त्यांनी गाडीवर बाळूला आपल्या पाठीमागे बसवले परंतु बाळू पुढेच बसणार म्हणून हट्ट करू लागला. पुढे बसल्यानंतरच तो दवाखान्यात गेला. दवाखान्यात बाळूच्या जखमेवर वीस टाके घालण्यात आले. वीस

टक्क्यावरूनच जखमेची खोली, रुंदी लक्षात येते. परंतु बाळू निगरगट्टपणे सहन करत होता. त्याची सहनशक्ती प्रचंड होती.

बाळू एकदा रविवारच्या दिवशी पेरूच्या झाडावर चढला होता. चारपाच पेरु काढले. पेरूच्या फांदीवरच बसून त्याने ते खाल्ले. तेवढ्यात आले वानर. ते बाळूच्या घरावर चढले. तिथून वानराने शेतात उडी घेतली बाळू चढलेल्या झाडावर चढू लागले. त्याला घाबरुन बाळूने पेरुच्या झाडावरुन खाली उडी मारली. तशी वानराने बाळूचा एक पाय आणि हात धरला आणि मुस्काटात लावू लागले. बाळू, "आई मेलो मेलो" म्हणून ओरडू लागला. बाळयाचा आवाज ऐकून त्याची आई काठी घेऊन धावत आली. ते पाहून वानर पळून गेले. ती

बाळूला म्हणाली, "तुला लागलं का बाळा?"

"न्हाय न्हाय लागल्यालं" एवढा मार खाऊनही बाळू म्हणाला.

उन्हाळ्याची सुट्टी होती. बाळूच्या घराशेजारची पोरं तिसऱ्या इयत्तेतील अवधूतच्या घरी बसलेली. ती बाळूला दिसली. तोही अवधूतच्या घरी गेला. तेवढ्यात ती पोरं लखनच्या घरात गेलीत. तिथेच त्याला नेहा दिसली. त्यानं घरातनं बॅटरी आणली आणि तिच्या तोंडावर उजेड पाडला. तेवढयात त्याला वटवाघूळ दिसले. त्याने त्याच्यावर बॅटरी

मारली. त्यासरशी वटवाघूळ त्याच्या अंगावर येऊन धडकलं. त्याला पाहून बाळू पाठीमागे उलटा पडला.

बाळूला त्याच्या वडलांनी नवीन सायकल आणलेली. बाळू रस्त्याने ती फिरवत होता. दरम्यान त्याच गावात दिलेल्या त्याच्या मावशीच्या मुलगीला कल्याणीलाही नवीन सायकल आणलेली. बाळू सायकल फिरवत घसारीने चाललेला. बाळूला अचानक काय वाटले बाळूने मध्येच ब्रेक दाबला. कल्याणी पाठीमागून सायकलवरुन आलेली. दोघांची जोरदार धडक झाली. त्यामुळे कल्याणीची करंगळी ब्रेकच्या हँडलमध्ये अडकून फ्रॅक्चर झाली. ती मोठ्याने रडू लागली. सायकल तिथंच टाकून ती आईकडे गेली. आईने विचारले, "काय झाल?"

"बाळूला मी धडाकलो, रगात यायला लागलंय"

"कसं काय झालं?"

"बाळूनं ब्रेक दाबला नि मी पाठीमागनं फास्ट आल्यालो माझी नि तिची धडाक झाली" असे सांगून ती जोरजोराने रडू लागली. जोरात धडक झाल्याने सायकलचा ब्रेक तुटला, पंक्चर झाली, हँडल तुटला. बाळूची सायकलही पंक्चर झालेली. पाठीमागून सायकल ढकलणाऱ्या श्रेयालाही लागलेले. तिची मम्मी बाळूला म्हणाली,

" तू सगळ्यास्नी पाडतूयास तुला लाजबीज वाटत न्हाय का?"

"मला लाज वाटत न्हाय, तुमची श्रेया का पाठीमागनं ढकलत हुती?"

तिचा भाऊ शौर्यने सांगीतले, "दिदीच बळंच्यान ढकलत हुती"

बाळूचे पप्पा त्याला म्हणाले, " तू सगळ्यास्नी पाडतूयास सायकल माळ्यावर ठेवीन"

"पप्पा, मी आता न्हाय कुणाला पाडत, तिच माज्या मागनं येत्यात"

' कल्लीला बग जा किती लागलंय '

" एवडं एवडंस लागलंय"

" आरं रांडच्या केवढं लागलंय बग जा"

त्याचं पप्पा तसं म्हटल्यावर बाळू कल्याणीला बघायला मावशीकडे गेला.

मावशी बाळूला पाहून म्हणाली,

" बग माज्या पुरगीला किती लागलंय"

" मला बी किती लागलंय बग की"

म्हणून आपला जखम झालेला हात तिला दाखवला. तेवढ्यात कल्याणीचे वडील कामावरुन आले. त्यांचं लक्ष कल्याणीच्या बोटाकडे गेले,

"बोटाला काय झालंय?" ते म्हणाले. त्यांनी तिला गाडीवर घेतले आणि दवाखान्यात नेले. डॉक्टरांनी तिच्या बोटाला प्लॅस्टर केले. त्यानंतर काही दिवस बाळू मावशीकडे फिरकलाच नाही. आठ दहा दिवसानी तो मावशीकडे गेला. कल्याणीचे प्लॅस्टर पाहून म्हणाला,

"हिचं प्लॅस्टर काडलं न्हाय व्हय आजून?"

" आरं कुत्र्या, तूच पाडलंस आणि तूच काढलंस का न्हाय ईचाराय लागलायस व्हय?"

"आगं मावशे, तुजीच पुरगी पाटीमागनं फास्ट आल्ती. मला काय ऐकू आलं नव्हतं म्हणून मी तिथंच थांबलो आणि दुसऱ्याच्या संगट बोलत हुतो आणि मग ती पाटीमागनं आली नि मला धडाक घाटली. मग ती तुज्याकडं रडत आली."

कल्याणीची आई मावशी बाळूला म्हणाली,

" तूच काडायचं ती प्लॅस्टर कुत्र्या"

" मी का काडू?"

" कुत्र्या, कुत्र्या तू माज्या पुरगीला पाडलंस म्हणून"

" तुजी गुणाची क न्हाय ती पुरगी, मी न्हाय काडणार"

" कुत्र्या तूच काड, न्हाय तर तुज्या मम्मीला न्हायतर पप्पाला सांगणार"

"सांग जा, जा ;मी काय भीत न्हाय"

असा हा बाळू कुणाची भाडभीड बाळगत नव्हता.

एके रविवारी बाळूला घराच्या पाठीमागे एक पेरु दिसला. त्याला वाटलं हाताला येईल. तो तिथे गेला आणि पेरू काढायला उड्या मारू लागला. पहिल्या उडीत पेरू हाताला आला नाही. दुसऱ्या उडीत पण पेरू हाताला आला नाही. तिसऱ्या उडीत माकडाने हातच धरला आणि वर ओढला. तसा बाळू वर गेला हाताने फांदी धरली. त्याला वाटले आपण आता खाली पडणार. तेवढ्यात त्याला एक पेरु दिसला तो डाव्या हातानं काढायला गेला. तेवढ्यात उजवा हात सुटला आणि बाळूची उडी बरोबर माकडाच्या खांद्यांवर पडली ते माकडही खाली पडले. माकड खाली आणि माकडाच्या अंगावर बाळू. तो तसाच घाबरून घराकडे पळत सुटला. ते माकड त्याच्या पाठीमागून आले आणि त्याची पँट धरली. बाळू त्याच्या तावडीतून सुटायचा प्रयत्न करत होता. माकडाने पँट धरलेली ती सुटता सुटंना. तेवढ्यात पँट फाटली आणि माकडाच्या हातात घावली. तसा बाळू पँट सोडून घराकडे धावत सुटला. ते माकड बाळूच्या पाठीमागे लागलेले. बाळू धावत घरात आला, कसबसं दार उघडून आत शिरला आणि दार लावून घेतले. घरात आई होती त्याला बिना पँटचा पाहून. ती म्हणाली, "आरं पँट कुठाय?, पेरु काढाय गेल्तास न्हवं?"

" व्हय, माकडानं घेटली हिसकावून" बाळू तसे म्हणताच आईची हसूनहसून पुरेवाट झाली.

एके दिवशी संध्याकाळी बाळ्याचं पप्पा कामावनं आलतं. बाळ्या अभ्यास करत बसल्याला. शाळेत सरांनी त्याला इंग्रजी नावं तयार करायला सांगीतलेली. बाळू घरात फिरत नावं मनानं तयार करुन उभ्या उभ्या लिहित होता. त्याचे वर, आजूबाजूला लक्ष नव्हते. नेमका तो त्याच्या पप्पाना धडकला. कामावरून कंटाळून आलेल्या पप्पांनी हेल्मेट काढले आणि बाळूच्या पाठीत हाणलं. बाळू म्हणला,

'पप्पा, का मारलं?

पप्पा म्हणाले, 'फुडं दिसत न्हाय?, मी हाय न्हवं. तुला दिसत न्हाय? तुला काठीनंच फोडतो.' पप्पान खरंच चिव्याची काठी घेतली आणि बाळूला झोडपून काढले. तरी बाळूचं हूँ की चूँ नाही. मार खाऊन वर विचारतोय कसा,' ', पप्पा एवडं का मारलंसा मला? '

'एका जाग्याला बसून आभ्यास कराय येत न्हाय?, थांब तुज्या शाळंत ईवून सरास्नीच सांगतो'

त्याची आई म्हणाली,

"सरास्नी सांगू नकासा न्हाय तर पाॅर मार खाईल आणि हाय तेज्यापेक्षा लयच बारकं हुईल. मग बसंल पज्यासंगट खेळत"

'"मी पयलं तेज्यासंग खेळत हुतो. आता काय मी खुळा हाय व्हय तेज्यासंग खेळाय?, ते मलाच घाणघाण शिव्या देतंय".

एके दिवशी संध्याकाळी गावातल्या एक वर्षाचा मुलाचा वाढदिवस होता. मग त्यावेळी जेवण होतं.बाळू घरातनं जेवण करुन आलेला. तिथं त्याच्या ओळखीचा सोन्यादादा म्हणला,

" बाळ्या जेवतूस काय रं?"

" न्हाय मी घरातनं जेवून आलूय"

बाळू म्हणला,

" खा की जरासं" म्हटल्यावर बाळू बसलाच जेवायला. पुरी, बासुंदी, भात घेऊन वाडपी आला.बाळू नको नको म्हणत असताना जाम वाढलं. बाळू वदनी कवळ घेता श्लोक म्हणू लागला. पलीकडे गुरुदा बसलेला. त्याला तो ऐकू गेला. तो म्हणला,

" बाळ्या काय म्हणतूयास मोठ्यानं तर म्हण"

"मोठ्यानं म्हणलं तर सगळ्यास्नी ऐकू जाईल." बाळू म्हणाला.

बाळू जेवत जेवत श्लोक म्हणत होता आणि सगळे गपगुमान जेवत होती. बाळू बासुंदी प्याला नि,

"बास मला" म्हणून उठू लागला. तसा गुरुदा म्हणाला , "ती गप खायाचं सगळं"

कुणी बाळूला उठूच देईनात. बाळूचं तर पोट तुडुंब भरल्यामुळे जेवण जाईना झालेलं. सगळी पंगत उठली तरी बाळू कसाबसा जेवत होता. बाळूनं इकडे तिकडे पाहिले कुणी न्हाय असं पाहून घराकडे तर्राट सुटला.असा हा करामती बाळू एका ठिकाणी कधीही स्थिर बसत नसत. काही ना काही उचापती करत.

करामती बाळू

अनिल शिणगारे

वंदू आणि वानरं

५ . वंदू आणि वानरं

वंदू चौथीत शिकत होती. तिचा भाऊ सहावीत शिकत होता. वंदू खूप बोलकी आणि हुशार होती. कोणतीही घटना पटकन तिच्या लक्षात रहात. घरी, बाहेर, शाळेत कोण काय बोलते याच्याकडे तिचे बारीक लक्ष असायचे. कोणी तिच्यावर रागावले की ती रुसून बसायची. मग तिचा भावडया तिची समजूत काढायचा. बहिण- भावडांचा एकमेकांवर फार जीव होता. त्यांची आई वंदू चार महिन्याची असताना वारली होती. तेव्हापासून तिच्या आजीने दोघांचा सांभाळ केला होता. आज्जीचाही आपल्या नातवांवर फार जीव होता. ती जराही नजरेआड झालेली तिला खपायची नाहीत. परगावी कुठेही ती गावाला जाताना आपल्या नातवंडांना घेऊन जात. एकदा ती पाटाच्या वाडीला नातवंडांना घेऊन बहिणीकडे वंदू आणि आदित्यला घेऊन गेलेली. तिच्या बहिणीच्या मुलालाही एक मुलगा आणि एक मुलगी होती मुलाचे नाव किरण तर मुलीचे नांव आराध्या होते. दोघंही वंदू आणि आदित्यच्या वयाची होती. आराध्या वंदू एवढीच होती. किरण आदित्यच्या वयाचा होता. त्या चौघांची तिथे छान गट्टी जमलेली. क्रिकेट, लपाछपी, सूरपारंबी, लंगडी, जिबली, लगोरी हे खेळ ते खेळत. एकदा ते घरापासून थोड्या अंतरावर डोंगरात जांभळं आणि करवंदं आणायला

गेलेली. आदित्य आणि किरण पुढे गेलेले. वंदू आणि आराध्या रमतगमत मागून चाललेल्या. किरण वंदू आणि आराध्याला म्हणाला,

"आम्ही जांभळं आणतो तवर तुमी हिथं करवांदं तोडा"

"बर"

वंदू आणि आराध्या करवंदाच्या जाळ्या पाहून करवंदं तोडू लागल्या. तेवढ्यात त्यांना आपल्या पाठीमागून कुणीतरी येतंय असा उगीचच भास होऊ लागला. दोघींनी चौफेर नजर फिरवून पाहिली तर कुणीच दिसत नव्हतं. वंदू करवंदाच्या जाळीच्या एका बाजूला अणि आराध्या दुस-या बाजूला करवंदं तोडत होत्या. थोडी तोडून झाली असतील नसतील तेवढ्यात एक वानर उड्या मारत तिथं आले. त्याच्या पाठीमागे मोर आणि मोराच्या पाठीमागे कुत्रे त्यांच्याकडे येत असलेले पाहून दोघी खूप घाबरल्या. त्यांनी तिथून पळून जायचा प्रयत्न केला. परंतु वानराने वंदूला पकडले आणि तीन चार मुस्काडीत लावल्या. ती मोठ्याने ओरडू लागली. तिच्या आवाजाने जनावरं हिंडवायला आलेला गुराखी हातात काठी घेऊन आला आणि काठी घेऊनच वानरांच्या अंगावर धावला. तसे वानर घाबरून पळून गेले. परंतु वंदू भेदरून गेलेली. ती लटालटा कापत होती. त्यानंतर ती जांभळे किंवा करवंदं आणायला तिकडं डोंगरावर कधीही गेली नाहीत .

उन्हाळ्याच्या सुट्टीत असेच एकदा वंदू तिच्या आत्याकडे तळसंद्याला गेलेली. वंदू आणि तिच्या आत्याची मुलगी सई सारख्या टी.व्हीवर कार्टून बघत बसत. डोरेमॉन, छोटा भीम या मालिका त्यांना खूप आवडायच्या. तासनतास त्या कार्टूनच बघत बसत. घरातील दुस-याकडे टी.व्हीचा रिमोट देत नसत. आत्याही आपल्या भावाची बिन आयची पोर म्हणून तिचा खूप लाड करत. तिला चांगलेचुंगले करुन खायला घालत. एके दिवशी तिची आत्या वंदूला आणि सईला म्हणाली, "जावा जरा शेताकडनं जाऊन या जावा, लवकर येऊ नगा जरा उशीरपर्यंत खेळा"

वंदू आणि सई गावापासून थोड्या अंतरावर असलेल्या शेताकडे खेळायला गेल्या. शेतात आंब्याचे झाड होते. आंबे पाहून वंदू झाडावर चढली. त्या झाडावर अगोदरच वानरं येऊन बसलेली. त्यातल्या एका वानराने वंदूचा हात पकडला आणि ते वर ओढू लागले. तशी वंदू घाबरली आणि ओरडू लागली. सईने ते पाहिले आणि ती खालून तिचा पाय पकडून ओढू लागली. वानर हात वर ओढू लागले तर सई पाय खाली ओढू लागलेली. वंदूला काय करावे समजेना. त्या दोघी जोर जोरात ओरडू लागल्या. तसा रस्त्यानं जाणारा एक माणूस आला आणि वानराला दगड मारला तसा त्याने वंदूचा हात सोडला, मग कुठे तिच्या जीवात जीव आला. त्या जाम घाबरलेल्या. घाबऱ्याघुबऱ्या तशाच अवस्थेत दोघी पळतच घरी आल्या.

वंदू एकदा आपल्या सुमन आत्याकडे किणीला गेलेली. एके दिवशी आत्यासोबत तिच्या शेतात गेलेली. आत्या शेणी लावत होती आणि वंदू झाडांच्या सावलीत विटीदांडूनं खेळत होती. आत्या शेणाची भरलेली पाटी घेऊन जाई आणि वाळलेल्या शेणी उलथत. वंदू पेरुच्या झाडावर चढली आणि पेरु काढून खाऊ लागली. तेवढ्यात चार पाय वानरं - गोल करून झाडाच्या भवतीनं ईच ईच करत बसलेली. त्यांना पाहून वंदू घाबरली. त्यातले एक वानर पुढे आले आणि वंदूच्या हातातील पेरु हिसकावून घेऊन गेले. तेवढ्यात दुसरे वानर आले आणि वंदूच्या मुस्काटात मारु लागले. वंदू घाबरुन ओरडू लागली. तिचा ओरडा ऐकून आत्या काठी घेऊन आली तशी वानरं पळून गेली.

वंदू धबधबेवाडीला सारिका आत्याकडे गेलेली. वंदू, गौरी आणि आयुष सतत दंगा करत असलेली पाहून ती म्हणाली, "जावा जरा भाईरनं वढ्याकडनं फिरुन या जावा. लांब कुठं जाव नगा"

"बर" म्हणून वंदू, गौरी आणि आयुष तिघे मिळून ओढ्याकडे गेले. आयुष ओढ्याच्या काठावरील दगडावर बसला. वंदू आणि गौरीही त्याच्या पाठीमागे दगडावर बसली. तेवढ्यात दगड एकाएकी हालू लागला. पोरांना कळंना काय हलायला लागलंय. काय हालतंय त्यांच्या लक्षात येईना.

तिथूनच घुरघुर असा आवाज येऊ लागला. त्यांनी आवाजाच्या दिशेने निरखून पाहिले ; तो दगड नव्हता, मगर होती. तिला पाहून घाबरुन त्यांनी तिथून धूम ठोकली. ते पळत जाताना वाटेत वानरं होती. त्यांना पाहून ते ईच ईच करु लागले. तसे ते जास्तच घाबरले आणि कसेबसे घर गाठले.

ससुला

६ . ससुला

लोखंडी पिंजऱ्यात ससुला एका कोपऱ्यात डोळे मिटून शांत बसला होता. समोर टाकलेले मऊशार गवतही त्याला खावेसे वाटेना. त्याच्या मनात उदासी दाटून आलेली. खूप निराश वाटत होतं ; राहून राहून त्याला ससुलीची आठवण यायची. ती त्याच्यावर रुसून कुठेतरी दूर निघून गेलेली. त्याने तिला कितीदा तरी फोन केला होता. परंतु तिने फोन उचलला नव्हता की व्हॉटसपवर मेसेज केला नव्हता. ससुला मात्र तिला दररोज सकाळी उठल्या उठल्या 'गुड मॉर्निंग' मेसेस करायचा. ससुली मेसेज पहायची पण रिप्लाय द्यायची नाही. कारण फोनवरून दोघात कडाक्याचे भांडण झाले होते. ससुला सतत फोनवर मेसेज वाचत बसत. काही कामधंदा न करता तासन्तास फेसबुक, व्हॉटसप, ट्विटर, इन्स्टाग्रामवर पोस्ट टाकून किती लाईक मिळाल्या बघत बसायचा. त्याला त्यामुळे ससुलीचा विसर पडत चाललेला. तिने बऱ्याचदा त्याला फोनचा वापर कमी कर म्हणून सांगीतले तरी तो तेवढ्यापुरतेच ऐकायचा. थोडा वेळ मोबाईल दूर ठेवत आणि पुन्हा त्याला चिकटून बसला की,

"अहो, जेवायला या, शेतात जाऊन या, बझारमधून सामान घेऊन या, घर झाडायचं हाय."म्हटलं तरी हा आपला आपल्याच जगात.

उठल्यापासून झोपेपर्यंत सतत मोबाईल. कुठल्याही कामाकडे लक्ष नाही. त्याच्या या वागण्याला कंटाळून ससुली रुसून निघून गेलेली.

बैल गेला आणि झोपा केला तसा प्रकार ससुल्याचा झालेला. ससुली जवळ होती तोवर तिच्याकडे त्यानं लक्ष दिलं नव्हतं. परंतु ती रुसून गेली आणि तिची सारखी त्याला आठवण यायला लागली. तो एकटाच तिच्या विरहात ध्यान लावून बसायचा. एके दिवशी एका शेतकऱ्याने हळूच पकडून त्याला पिंज-यात टाकले. तेव्हा तर त्याला तिची खूपच आठवण यायला लागली. तो तिच्या नावाचा जप करू लागला. अन्न, पाणी त्याला गोड लागेनासे झाले. शेतकरीदादा चांगला होता. तो दररोज त्याला मऊ मऊ गवत आणून घालत, पाणी, दूध घालत. तरी ससुला उदास उदास बसलेला दिसत. तेव्हा शेतकरी दादा त्याला विचारत,

"कारं बाबा इतका दु:खी कष्टी झालायस? मला सांग तुला काय हवंय?"

"माझी राधी, ससुली माझ्यावर रुसून कुठेतरी दूर निघून गेलीय दादा. मला तिच्याशिवाय करमत नाही, तिला आणून देशील?"

"अरे पण ती का गेली?"

"मी सारखा मोबाईल घेऊन बसत म्हणून रुसून कुठेतरी दूर निघून गेलीय ".

" हो का? बरंच झालं मग आमचंपण कार्ट उठल्यापास्नं मोबाईल घेऊन बसतंय. वैताग आणलाय या मोबाईलनं. कामधंदा सुचून देत न्हाय. "

" माजी चूक झाली दादा. मी कामधाम सूडून मोबाईलवर बसत. आता न्हाय मी लय वापरणार "

" आमचं कार्ट दहा वेळा मला म्हणलंय हिथनं फुडं मोबाईल वापरणार न्हाय पण चार दिस गेलं की मागं तसं पुडं. ही दारूपेक्षा वाईट हाय "

" व्हय दादा खरं हाय ह्येनं घरादाराचा पार इस्कूट हुतूय. उगाच कायतर व्हायरल हुन भांडणं वाढायला लागल्यात. टेटसवरनं भांडणं हुत्यात."

"मग एवडं सगळं कळतंय आणि तरीबी त्यावरच? "

" हे यसनच असं हाय, पर हितनं फुडं मी जीव गेला तरी मोबाईल वापरणार न्हाय. ह्येच्या आदी मोबाईल नव्हता तर कामं थांबली हुती काय? "

" मोबाईलचा चांगल्यासाटी कारणापुरताच उपेग केला पायजेल. तेज्या आहारी जाऊ नये. ते दुधारी शस्त्र हाय ".

एवढ्या कळकळीनं सांगणाऱ्या ससुल्याचे शेतकरी दादाला त्याचे दु:ख पाहून वाईट वाटले. त्याला त्याची दया आली. तो म्हणाला,

"मला तुजी ससुली सापडली, दिसली तर मी तुझी शोधून आणून देईन, बरं पण मी तुझी ससूली ओळखणार कशी?"

"तिच्या उजव्या हाताच्या मधल्या बोटात मी दिलेली हिऱ्याची अंगठी आहे, ती चमकली की ती माझी ससुली समज"

"बरं बरं, मग तर मी उद्यापासून तिला

सगळ्या शेतशिवारात शोधन, पण ती माझ्यासोबत येईल का?"

" तू मला सोबत नेलेस तर मी तिला ओळखेन. मी तुझ्या खांद्यावर बसून येईन, तिची समजूत काढीन "

"पण माझ्या कामाचा सगळा खोळंबा होईल, जनावरांचं चारापाणी कोण करणार?सगळा खोळंबा होईल त्याचं काय ?"

" शेतकरी दादा, आम्ही दोघं तुझी सगळी कामं करीन, तुझ्या शेतावर कुणाला येऊ देणार नाही, आलंच तर तुला धावत येऊन सांगेन."

ससुल्याचा हिरमुसला, उदास चेहरा पाहून शेतकरीदादाला त्याची दया आली. त्याने दुस-याच दिवशी ससुल्याला खांद्यावर उचलून घेतलं

आणि एकेक शेत शोधत तो निघाला. दिवसभर शेत-शिवारात ससुलीला शोधले पण ती कुठेही दिसली नाही. तो कंटाळून परतीच्या वाटेला लागणार तितक्यात त्यांना एका ठिकाणी काहीतरी चमकत असलेले दिसलं. शेतकरी दादाला ससुला म्हणाला,

"दादा, आपण तिकडं जाऊ ती तिथंच आसंल"

अगदी हळुवार दोघं आवाज न करता तिथं पोहोचले तर तिथे ससुली अर्धमेल्या अवस्थेत बसलेली. ससुल्याला तिची अवस्था पाहून खूपच वाईट वाटले. त्यानं

तिला - राधे राधे म्हणून लाडाने हाक मारली. ओळखीची हाक ऐकून ससुलीनं डोळे उघडले . समोर ससुल्याला पाहून तिचा आनंद गगनात मावेनासा झाला. आपला धनी आपल्याला शोधत इथंवर आलेला पाहून तिला खूप बरं वाटलं. मोबाईल मुळे विसरलेला ससुला येतोय का नाही याची धास्ती आणि चिंता लागून राहिली होती. परंतु तो आलेला पाहून दोघातील गैरसमज दूर झाले. शेतकरी दादाला त्यांची भेट झालेली पाहून खूप आनंद झाला.

दोघांच्याही डोळ्यातून अश्रू वाहू लागले. त्यामुळे दोघांना एकमेकां समोरचे दिसेनासे झाले. भावनावेग ओसरल्यावर ससुला तिला म्हणाला

"राधे, आजपर्यंत मी माझ्याच धुंदीत वागत होतो. परंतु इथून पुढे मी तुझं सगळे ऐकेन. दोघं मिळून सुखानं संसार करू. आपण जिथं राहू तिथं स्वर्ग निर्माण करू. ज्या शेतकरी दादाने आपला कामधंदा सोडून आपल्याला मदत केलीय त्याच्यावर कुठलंही संकट येईल तेव्हा आपण त्याला सावध करायचं काम करू. मला आपल्या दोघांची पुन्हा भेट होईल असं वाटत नव्हते. परंतु आपण भेटावं ही नियतीचीच इच्छा असावी, इथून पुढे आपण दोघेही आनंदी राहू आणि इतरांनाही आपण आनंद वाटू."

रॉकीची शाळा



७ . रॉकीची शाळा

एक होता कुत्रा. त्याला सगळे रॉकी म्हणत. रॉकी समोरच्या मोकळ्या अंगणात बसला होता. रात्रभर पहारा देऊन आता कुठे तो झोपला होता. तेवढ्यात कशाचातरी आवाज झाला त्याला पटकन जाग आली. त्याने कान टवकारले दोनदा शेपटी जमीनीवर आपटली आणि तो उठून उभा राहिला. बसलेल्या जागेच्या समोरच्या घरात लाईट लागली दरवाजा उघडला गेला तसा तो धावतच तिकडे गेला. शेपटी हालवत तो मालक चपाती घालेल या आशेवर उभा राहिला. घराच्या मालकाने नेहमी प्रमाणे बुट्टीतली चपाती रॉकीला टाकली. रॉकीन वास घेतला आणि मटामटा चपाती खाऊ लागला. तेवढया चपातीने त्याचे पोट भरले नव्हते म्हणून तो पुन्हा आशाळभूतपणे मालकाकडे पाहू लागला. मालकाने डब्यातील बिस्किटे टाकली. बिस्किटे पाहून रॉकीला खूपच आनंद झाला

रॉकी दररोज ठरलेल्या घरात खाऊसाठी शेपटी हलवत उभा रहायचा. त्या घरातील रॉकीला न चुकता चपाती, बिस्किटे, पाव घालत. रॉकी भाकरी खात नव्हता. ती त्याची सवय सर्वांनी माहित झाली होती. यामुळे रॉकीसाठी एकेक चपाती जादा केली जायची. त्या घरातील मुलेही

रॉकीला खूप आवडायची. मुलेही त्याच्या पाठीवरून हात फिरवत. गुंडयातर त्याच्या पाठीवर घोड्यासारखा बसत. रॉकीला गुंड्या पाठीवर बसला की खूप मज्जा वाटायची. तो दुडकत, दुडकत चालायची नक्कल करायचा. गुंड्या आणि श्रीवर्धन दुसरीत शिकत होती. ते दोघे दररोज दहा वाजता शाळेला जायचीत. गुंडया आणि श्री शाळेला गेलीत की रॉकीला करमायचं नाही. तो त्यांच्या शाळेच्या वाटेकडे डोळे लावून दिवसभर बसायचा. एकदा त्याची अशीच तंद्री लागली होती. जणूकाही त्याला स्वप्न पडले होते...

एके दिवशी गुंड्या आणि श्री शाळेला चालले होते. रॉकीने त्यांना पाहिले. तोही त्यांच्या पाठीमागून धावत जाऊ लागला. आपल्या पाठीमागून आज रॉकी येतोय हे त्यांनी पाहिले.,

"रॉकी घरी जा" म्हणून त्यांनी हुसकावले. तो तेवढाच पाठीमागे पळायचा आणि पुन्हा त्यांच्या पाठीमागे जोरात धावत जात. हा त्यांचा खेळ शाळेपर्यंत चाललेला. रॉकी त्यादिवशी त्यांच्यापाठीमागून शाळेत गेला. त्यांची शाळा पाहून रॉकीला आश्चर्य वाटले. सर्व लहान लहान मुलेच मुले होती. सगळे हात जोडून प्रार्थना म्हणत होते. रॉकीनेही पुढचे पाय उचलून जुळवले आणि उभा राहिला. जणू तोही त्यांच्यासोबत प्रार्थना म्हणू लागला . प्रार्थनेनंतर मुले वर्गात गेली. बाहेर आता कुणीच नव्हते .रॉकीने गुंड्या आणि श्रीचा वर्ग शोधला वर्गाच्या पाठीमागे उभा राहून तो आत पाहू

लागला. मॅडम मुलांना कविता शिकवत होत्या. मुले नाचून कविता म्हणत होते. गुंडया आणि श्री तर किती मन लावून नाचत होते. त्यांना पाहून रॉकीही नाचू लागला. जणूकाही त्याला ती कविता समजली होती. त्यानंतर बाईंनी ससा कासवाची गोष्ट सांगीतली. रॉकीने तीही गोष्ट ऐकली. मन लावून तो गुंडया आणि श्रीच्या वर्गातील शिकवण्याकडे लक्ष देवून पाहू लागला.

मधली सुट्टी झाली. मुले डबे घेऊन गोल करून जेवायला बसली. रॉकीलाही कडकडून भूक लागली होती. तो गुंड्या आणि श्री जेवायला बसले होते तिथे गेला. त्याला पाहून लहान मुले घाबरू लागली. परंतु गुंड्या आणि श्रीने सांगीतले,

"अरे आमचा रॉकी आहे. घाबरु नका, काही करत नाही"

त्यांनी रॉकीची सर्व मुलांना ओळख करून दिली. आता रॉकी सर्वांचाच लाडका झाला. सर्वच मुलांनी त्याला डब्यातील भाकरी, चपाती दिली रॉकीचे पोट तुडुंब भरले, मुले डबे धुवायला हौदाला गेले. तिथे नळाला रॉकी पाणी प्याला. सर्व मुले लघवीसाठी मुतारीत गेली. रॉकीने ते पाहिले त्यानेही मुतारीत लघवी केली. उघड्यावर लघवी करायचे नाही असे त्याने ठरवले. रॉकीला श्री आणि गुंडयाची शाळा खूप आवडली. तो दररोज त्यांच्या पाठीमागून शाळेत जाऊ लागला. तसतसा त्याच्या वागण्यात बदल होऊ लागला. स्वच्छतेच्या चांगल्या सवयी त्याला लागल्या तो कुणावरही

धावून जात नसत. अनोळखी, संशयास्पद हालचाल दिसली तर मात्र तो धावून जायचा. रॉकीचे अनेक मित्र आणि मैत्रिणी होत्या. त्यांनाही त्याने शाळेतल्या गमतीजमती सांगीतल्या.

एके दिवशी असाच रॉकी शाळेत गेला होता. तेव्हा त्याला वाटले अशीच आपली शाळा असती तर तो स्वप्नात हरवून गेला. शाळेत सर्व कुत्री होती. मोठा कुत्रा

नाच-गाणी शिकवत होता. रॉकी मन लावून नाच करत होता. त्या मोठ्या कुत्र्याला सगळे सर म्हणत होते. सर सर्वांना गोष्टी सांगत, गणिते सोडवायला लावत. चित्रे काढायला लावत. एके दिवशी रॉकीने रंगपेटी आणली नव्हती. तेव्हा त्याच्या मित्राने रंगपेटी दिली. चित्र रंगवता रंगवता ते एकमेकांच्या अंगावर रंग टाकू लागले. सगळे रंगले. तेवढ्यात सरांनी पाहिले आणि त्यांनी मारायला सुरवात केली. आपल्यालाही मार बसणार म्हणून तो लपून बसला.

परंतु सरांनी त्याला शोधलेच. त्याच्या पाठीत धपाटा बसणार एवढयात त्याची तंद्री भंगली आणि तो जागा झाला.

जॅक आणि जिमी



८. जॅक आणि जिमी

एक होता कुत्रा. त्याचे नाव होते जॅक एक होती मांजर, तिचे नांव होते जिमी. जॅक आणि जिमीला एका शेतक-याने पाळले होते. जॅक लहान असताना शेतक-याच्या मुलाने त्याला आणले होते. तेव्हापासून जॅक सर्वांचा लाडका झालेला. जॅकला घराबाहेर लोखंडी जाळीच्या घरात बांधला जात होता. तिथेच त्याला भाकरी, दूध, चपाती, भात, पेडीग्री घातली जायची. बाहेरचे कुणी आले तर जॅक त्यांच्यावर जोरजोरात भुंकत. त्याच्या आवाजाने घरातील सगळे बाहेर येत, कुणीतरी आले आहे हे त्याच्या आवाजाने घरातील लोकांना समजत जिमी मात्र घरात सगळीकडे फिरत. तिला ताजेताजे अन्न मिळत. ती सर्वांच्या मांडीवर बसत. सगळे तिला उचलून घेत. जॅक हे सर्व आपल्या जाळीच्या लोखंडी दारातून पहात त्याला जिमीचा हेवा वाटत. त्याला वाटायच मी घराची एवढी राखण करतोय पण माझी जागा मात्र बाहेरच. मी घरात जायचा प्रयत्न केला तर मला कुणी आत येऊ देत नाहीत. सगळे बाहेर हाकलतात. आणि हाकलले की जिमी मला वाकुल्या दाखवते. तेव्हा तर त्याला तिची खूप चीड यायची. तो तिच्या अंगावर धावून जात. परंतु प्रत्येकवेळी जिमी त्याच्या तावडीतून अलगद सुटत.

एके दिवशी रात्रीची जेवणं आटोपून सगळे गाढ झोपलेले. जॅकही आपल्या जाळीच्या घरात डोळे मिटून आरामात पहुडला होता. जिमी ताईच्या कुशीत अंथरुणात झोपलेली. ताईलाही तिच्याशिवाय झोप लागत नसत. तिच्या मऊ मऊ उबदार केसावरून हात फिरवत फिरवत तिच्याशी गुजगोष्टी करत, गप्पा मारत ती झोपत. ताईच्या वाढदिवसाच्या दिवशी तर तिची धम्माल असायची. ताई तिला घेऊन केक कापत. तिला केकचा एक तुकडा भरवत. मलाही ताई देईल म्हणून मी त्यांच्याकडे टकामका बघत. परंतु मला काहीच मिळत नसत. शेवटी केकचा कागद दुमडून माझ्याजवळ ठेवत. तो मी चाटत. खूपच छान लागत. तेव्हा जिमीची मला खूपच चीड येत. कारण तिला वाटत मी फक्त बसूनच असतो. कधीतरी कोण आले तरच भुंकतो. तिला वाटत आपण सगळया घरातून सगळीकडे फिरते म्हणजे मी किती काम करते आणि हा नुसता ऐतखाऊ आहे.

ताईला जॅकही लाडावून बघे, आपले अंग, शेपटी घासून बघे. परंतु ताई त्याला दूर हाकलत. नेमके त्यादिवशी सगळ्यांची झोप लागल्यावर चोरी करण्यासाठ चोर आलेले. जॅकला त्यांची चाहूल लागली. तो जोरात भुंकू लागला. त्याच्या आवाजाने जिमी जागी झाली. ती खिडकीतून बाहेर आली. चोर आत येण्यासाठी कडी उचकटत होते. जिमीने प्रसंगावधान राखून जॅकचा दरवाजा उघडला. जॅक बाहेर आला आणि चोरांच्या अंगावर

धावला. त्यासरशी चोराने जॅकचे दोन्ही पाय पकडले आणि त्याला दूर फेकणार इतक्यात जिमीने चोराच्या पायाच्या कडकडून चावा घेतला. वेदनेने चोर मोठयाने ओरडला आणि जॅकला सोडून दिले. त्यामुळे चोर घाबरून पळून गेले.

जॅक आणि जिमीच्या आवाजाने घरातील जागे झाले आणि दरवाजा उघडला. दाराच्या उचकटलेला कोयंडा पाहून त्यांना चोरीचा प्रकार लक्षात आला. आज निव्वळ जॅक आणि जिमीमुळे आपल्या घरात होणारी चोरी टळली याचे समाधान त्यांना वाटले. त्यांनी जॅक आणि जिमीला जवळ घेऊने त्यांची पाठ प्रेमाने थोपटली. जॅक जिमीचा रागराग करायचा बंद झाला. उलट त्याने तिच्याकडे पाहून प्रेमभराने अंग हालवले. त्याच्या त्या आदरपूर्वक हालचालीने जिमीही भारावली. तिनेही आपल्या पायाचा पंजा त्याच्या तोंडावरुन फिरवला. दोघांचे डोळे आनंदाने भरुन आले. ते दोघे चांगले मित्र बनले. त्या दोघांत गाढ मैत्री झाली..त्यांच्यातील भांडण मिटले.

प्रेमाने भारलेलं हृदय कधी भाडतं का?

गौरी

९. गौरी

एक गाव होतं. त्या गावांमध्ये गौरी नावाची मुलगी आपल्या वडिलांसह राहत होती. गौरी दहा वर्षाची असेल. ती चौथीमध्ये शिकत होती. तिची आई ती सहा महिन्यांची असतानाच वारली होती. त्यांना शेत-घर असे काहीच नव्हते. तिचे वडील दुसऱ्याच्या फार्म हाऊसवर कामाला राहिले होते. ते दिवसभर गवंड्याच्या हाताखाली दगड विटा देण्याचे काम करत तर कधी सिमेंटची पोती उचलायला जायचे तर कधी दुसऱ्याच्या शेतावर भांगलणीसाठी जायचे. जे मिळेल ते काम करायला जायचे. गौरी दररोज एकटी चालत शाळेला जायची. शाळा सुटल्यावर चालत यायची. घरातील सगळी कामे ती करायची. झाडलोट करायची, भांडीकुंडी घासायची आणि आपला शाळेचा अभ्यासही करायची. ती अभ्यासात खूप हुशार होती. वडील सकाळी कामाला गेले की संध्याकाळी उशिरा घरी परतायचे. कामावरुन येताना ते पिऊन भेलकांडातच घरी यायचे. तिला आपल्या वडिलांची खूपच काळजी वाटत. तिला त्यांच्याशिवाय कोणाचाच आधार नव्हता. त्यामुळे आपल्या वडिलांना काही झालं तर? पिऊन कुठेतरी पडून हात पाय मोडले तर?? आपले कसे होणार? याची काळजी त्या लहानग्या जीवाला सतत लागून राहायची. ती लहान वयातच स्वयंपाक करायला शिकलेली. भात, भाकरी, आमटी करत आणि आपल्या

वडिलांची जेवणासाठी वाट पाहत. एकदा शेजारच्या कमलताईंनी त्यांच्या घरी केलेल्या आठ दहा करंज्या तिला खायला दिलेल्या होत्या. परंतु तिने त्या न खाता तशाच आपल्या बाबांसाठी ठेवलेल्या. बाबा आले की दोघे मिळून खायचं असं तिनं ठरवलेलं. बराच वेळ ती वाट पाहत होती. परंतु वडिलांना यायला दररोजच्यापेक्षा जास्त वेळ झालेला. ती त्यांची वाट पाहून कंटाळून तिथंच झोपी गेलेली. "गौरी,गौरी" म्हणून तिच्या बाबांच्या हाका ऐकून तिला जाग आली. ती म्हणाली,

"बाबा, जेवला तुम्ही?"

तर ते म्हणाले,

"माझं पोट भरलंय. तू जेवली नाहीस?" त्यांनी मालकाच्या घरी जेवण होतं तिथून आपल्या लाडक्या लेकीसाठी बंदीच्या कळ्या चोरुन आणलेल्या. त्या त्यांनी मुलीला दाखवल्या ह्या खा म्हणून तिच्याकडे दिल्या.

तर ती म्हणाली,

"मी तुमची किती वाट बघितली, तुम्ही जेवायला आला की कमलताईनं करंज्या दिल्यात त्या दोघांनी खायच्या म्हणून"

तिने त्या बाहेर काढल्या आणि बाबांनाही जेवायला वाढलं. दोघं मिळून जेऊ लागले. तिच्या बाबांच्या डोळ्यांतून अश्रूधारा वहायला

लागल्या. माझी पोर माझी किती काळजी करते असा विचार करत ते जेवले आणि झोपी गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी गौरीला जाग आली. तेव्हा बाहेरून कुणीतरी हाक मारत होते. तिने दार उघडले. बाहेर पाहिले तर बाबा कामाला जात त्या शेताचे मालक आलेले. बाबा अजून झोपलेले. दिवसभर कामाने कंटाळून गेले होते. तिला बाबांना उठवायचे जीवावर आलेले. परंतु नाईलाजाने तिने बाबांना उठवले. मालक म्हणाले,

"अरे, तू राहिलेली गार घोळायचे काम कधी करणार? चार दिवसापासून पाला काढतोयस ते पैसे तेवढे घेऊन गेलायस. लवकरात लवकर गार तेवढी घोळून दे."

तिच्या बाबांचे अंग खूप दुखत होते. तरीसुद्धा ते उठले. तोंडावर पाणी मारलं. गौरीने केलेला चहा घेतला. खोरे पाटी घेऊन ते तसेच मालकांच्या पाठोपाठ शेतावर गेले. काही न खाता ते गेलेले पाहून तिला खूप वाईट वाटले. दररोज भाकरी भात खाऊन डबा घेऊन बाहेर पडणारे बाबा आज काही न घेता बाहेर पडलेले पाहून तिने भात भाकरी वांग्याची आमटी केली आणि डबा घेऊन ती बाबा ज्या शेतात काम करतात तिकडे गेली. तिथून ती घरी आली. तिने आपले सगळे काम आटोपून वेणीफणी

केली.दप्तर घेऊन शाळेला गेली. परंतु तिचा शाळेमध्ये जीव लागत नव्हता. सगळा जीव वडिलांच्याकडे होता. वडिलांचं काहीतरी दुखत असेल, आपण त्यांना मदत केली पाहिजे असे तिला वाटू लागले. ती दुपारच्या सुट्टीत तशीच घरी आली. बाबा जिथे काम करतात तिथे गेली. तिचे बाबा तिला म्हणाले,

"बाळ कशाला आलीस? तुला ही काम जमंल का?"

"जमतंय. मी पाट्या भरून टाकते, मला भरून द्या"

ती म्हणाली. दोघे बापलेक मिळून गार घोळू लागलीत. दिवसभर त्यांचे काम चाललेले. तहानेने घशाला कोरड पडली की ते पाणी पिण्यासाठी थांबत. गार घोळून होत आली होती. अंधार पडायला लागला होता. तरीही दोघं काम करत राहिले. दोघांचे अंग घामाने भिजलेले. मालकाने सांगितलेले काम पूर्ण झाले. तिच्या बाबांना आपल्या लहानग्या मुलीला हे काम करायला लागलं याचं खूप वाईट वाटलं आणि आपल्यासाठी आपले बाबा किती कष्ट करतात याची जाणीव तिला झाली. आपण खूप शिकायचं. मोठं व्हायचं आणि बाबांना असलं काम करू द्यायचं नाही. त्यांना आपण चांगलं सांभाळायचं असा तिने निश्चय केला.

करामती बाळू

अनिल शिणगारे

पज्या

१०. पज्या..

पहिलीत दाखल झालेल्या मुलांपैकी एक मुलगा चार-पाच दिवस झाले तरी शाळेला आला नव्हता. शासनाच्या धोरणानुसार शंभर टक्के उपस्थिती आवश्यक असते. तेव्हा तो मुलगा शाळेत का येत नाही म्हणून सरांनी त्याच्या घरी जायचे ठरवले. त्याचा भाऊ बालवाडीत शिकत होता. त्याचे नांव राजा होते. तो न चुकता बालवाडीला येत परंतु त्याचा मोठा भाऊ पज्या मात्र शाळेत येत नव्हता. सरांनी त्याला विचारलं,

"पज्या कुठे गेलाय ?"

"घरात अंडी घालतूय" असा तो गंमतीने म्हणत. असेच चार पाच दिवस निघून गेले. एके दिवशी सर शाळेत आलेल्या राजाला घेऊन त्याच्या घराकडे पज्याला आणायला गेले. पज्याचे घर गावाच्या बाहेर रस्त्याच्या कडेला होते. पज्या बाहेरच बसला होता. राजा गाडीवरुन उतरला, सरांनी गाडीला स्टँड लावून सर उतरले.

" कोण आलंय"? पज्यानं डोळ्यासमोर हात धरुन लांबूनच विचारले.

"सर आल्यात" राजा म्हणाला. पज्या म्हैशीच्या रेडकाला वैरण घालत बसला होता. बाजूला तीन म्हैशी बांधलेल्या होत्या. पज्याला सर म्हणाले,

"पज्या चल की शाळेला "

"आज न्हाय उद्या येतो".

" आज का न्हाय? "

" रेडकाची राकाण करायला सांगीटलय"

" तू राकाण करतूयास?"

'व्हय, कुत्रं ईवून म्हशीस्नी चावतंय"

"बर मग तू शाळा शिकणार का न्हाय?"

" शिकणार"

"शाळेत येत न्हायस आणि कशी शिकणार?"

"उद्या येतो".

पज्याचा उद्या उगवत नव्हता. सर आणायला गेले की उद्या येतो म्हणत परंतु येत नसत. येतो म्हटला पण दुसऱ्या दिवशी पज्या शाळेत आला नव्हता. सर त्याच्या घरी गेले. घरी त्याची आजी आणि पज्या दोघेच होते. सर त्याच्या आज्जीला म्हणाले,

"नातवाला काय शाळा शिकवणार हायसा का न्हाय?"

"शिकवायची हाय की फरं त्यो जाईत न्हाय तेला काय करायचं?"

" तुम्हीच जरा खटपट खाल्ली पायजेल. चार दिवस पज्याला घिवन ईवून तासतासभर बसलं तर पज्याला सवय लागंल."

"तेच्या आयलाच सांगा, न्हाय तर आज्याला"

"त्येचं वडील कुठं गेल्यात?"

" शेजारच्या पोरास्नी घिवन शाळंला सोडाय गेलाय दुस-याच्या पोरांच्यासाठी झटतूया आणि आपली आडाणी करतूय. काय करायच?"

" राजा बघा तुमचा दररोज येतूय"

"ते शाणं हाय, ह्येज्या मानव तामजाई बसलीया तिचा उतारा बुधवारी टाकतो मजी आपूआप ईतूया".

"बघा कायपण करा पण पज्याला शाळेला पाठवा"

" माजं पैसे येत्यात ती तुझ्या नावांवर टाकतो. राज्याच्या कमी आणि तुज्या नावाव जादा टाकतो म्हणलं तरीबी जाईना तेच्या आज्याला फोन करा".

" फोन नंबर सांगा"

राज्यान नंबर सांगीतला. नंबर लावला तर दुसरीकडे लागला. राजाला परत नंबर विचारला त्यानं एकेक करत अंक सांगीतला तो नंबर बरोबर लागला.

" नमस्कार, पज्याला शाळेला पाठवणार का नाही? "

" गुरुजी तुमी हाय व्हय?मी हिथं रंगवाय लागलूय,पोटासाठी काय तर कराय पायजे. उद्या शाळंत घिऊन येतो "

" ठीक आहे. उद्या आठवणीनं घेऊन या."

पज्याचे शाळेतील नाव प्रज्वल होते परंतु घरातील शाळेतील सगळे त्याला पज्याच म्हणत. पज्याचे वडील इंजिनियर होते. आई पदवीधर होती, आजोबा ग्रामपंचायतीत शिपाई होते. परंतु त्यांचे पज्याच्या शिक्षणाकडे लक्ष नव्हते. म्हणजे तो कुणाचेच ऐकत नव्हता. जास्त जबरदस्ती केली की तो डोळे पांढरे करुन पडायचा त्यामुळे ते त्याला शाळेत जा म्हणत नसावेत. लहान नातू राजाला ते न चुकता शाळेत पाठवत. शुक्रवारनंतर शनिवारी पज्या शाळेत येईल असे वाटले होते. परंतु त्यादिवशी आलाच नाही. सोमवारीही पज्या शाळेत आलेला नव्हता. ते पाहून सर एका मुलाला घेऊन पज्याच्या घराकडे गेले. पज्याची आजी घरी होती. पज्याचा मामा आलेला होता. पज्याच्या आईला सर म्हणाले, "ताई काय पज्याला शाळेला पाठवणार का न्हाय?"

' "अहो सर, मला सकाळपस्न सगळ्या शेतातनं पळीवलंय त्येनं".

" का बरं?"

"शाळेला चल म्हणताना"

"प्रज्वल चल बघू"

"न्हाय येणार मी 'म्हणून पज्या आईच्या कमरेला मिठी घालून रडू लागला. सर त्याला म्हणाले," अरे प्रज्वल शाळा शिकणार आहेस का न्हाय? चल की शाळेला"

"न्हाय मी येणार, उद्याच्याला येतो".

पंज्या सरळपणे ऐकत नाही म्हटल्यावर सरांनी आणि त्याच्या मामाने दोघांनी धरून उचलून गाडीवर त्याला बसवले. तो जोरजोरात मोठ्याने रडू, ओरडू लागला. शाळेत आल्यावर तो शांत झाला. त्याला नवीन कपडे घालायला दिली. टाय, बेल्ट दिला. ती घालून नटून थटून तयार आला. एका मुलीने आपलेली कॅडबरी खायला दिली. तो शाळेत रमावा म्हणून शाळेच्या मैदानावर तळ्यात मळ्यात, डोळे झाकून उलटे चालणे. सैनिक, गुरुजी, एकेका बोटीवर किती किती माणसं ? असे खेळ घेतले. तेव्हा पज्या खुश झाला. आनंदाने सर्व खेळात सामील झाला. दुपार झाली

जेवणाच्या सुट्टीत तो पोटभर जेवला.झाडांना पाणी देण्यासाठी पज्याला

सोबत घेऊन समर्थ पाणी घालू लागला समर्थने त्याला पाईप दिली आणि बागेतील फुलझाडांना असे पाणी घालायचे असते असे त्याने दाखवले तसे पज्या एकेका फुलझाडाला पाणी घालू लागला. पज्याला शाळेची गोडी लावण्याच्या प्रयोगाचा तो एक भाग होता. तो शाळेपासून वंचित राहू नये यासाठीची सरांची धडपड होती. ती फळाला येण्याची चिन्हे दिसू लागलेली. सांस्कृतिक कार्यक्रमाचा सराव चाललेला. इयत्तेनुसार नृत्य सराव चाललेला पज्या उत्स्फुर्तपणे जाऊन त्यात नाच करु

लागला. त्याला त्यासाठी प्रोत्साहन दिले. प्रत्येक गाण्यात तो नाचू लागला हे मात्र आश्चर्यकारक होते. मुलांना अभ्यासापेक्षा हे आवडत असलेले पाहून त्याला शाळेची आवड निर्माण होण्यातील मैलाचा ठरेल असे सरांना वाटले. दुसऱ्या दिवशी न सांगता तो शाळेला येईल असे वाटले होते परंतु तो आलाच नाही उलट त्याच्या आजोबांचा फोन आला '

"सर पज्याला येऊन न्या. "

परंतु सरांनी गाडी आणली नसल्याचे त्यांनी त्यांना सांगीतले. तिस-या दिवशी सर त्याला आणावयास गेले तर आईच्या कमरेला मिठी घालून पज्या रडू लागला. बाळूनं उचलून आणून तसाच गाडीवर बसवला. शाळेत आल्यावर मात्र तो चांगला रमला.

दुसऱ्या दिवसापासून पज्या परत गैरहजर दरम्यान क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धांमुळे सरांना त्याच्या घरी जायला वेळ मिळाला नाही आणि पज्याही शाळेला आला नाही.

आठवड्यानंतर सर पज्याला आणायला मोठ्या मुलाला घेऊन त्याच्या घरी गेले. त्याचे आजोबा आजी घराच्या अंगणात बोलत बसलेले,त्यांना विचारले,

""पज्या कुठे आहे? "

घरात बसलेल्या पज्याने सरांचा आवाज ऐकला आणि घरापाठीमागच्या शेताकडे धूम ठोकली. सरांनी त्यांच्यासोबत आणलेल्या मुलाला त्याच्या पाठीमागे पाठवले. पज्या पुढे,बाळू मागे, त्याच्या मागे आजोबा, त्यांच्यामागे कुत्रा धावत होता. पज्या पुढे जीव खाऊन पळत होता. सरांनी आणलेला मुलगा त्याच्या पाठीमागे तसाच धावत होता. पज्याच्या भवितव्याची चिंता करत रस्त्याच्या कडेला गाडीला टेकून सर उभे राहिलेले.

अनिल शिणगारे

शंभू आणि चिमणीची पिल्लं

११. शंभू आणि चिमणीची पिल्लं

एका गावात शंभू नावाचा एक मुलगा रहात होता. शंभू गावभर उनाडक्या करत हिंडत. कुणाचे चिकू चोर, पेरु, जांभळं, करवंदं चोर अशा कामात तो तरबेज झालेला. शाळेला सुट्टी असली की जनावरे हिंडवायला घेऊन गेला की - झाडावरील मधमाशांचे म्हव काढायचा. त्यातील मध मनसोक्त प्यायचा. दररोज नवनवीन खोडया, करामती करायची त्याला भारी हौस जनावरे घेऊन गेला की तो लगोरी घेऊन पक्ष्यांना टिपायचा, त्यांची घरटी मोडायचा, अंडी फोडून टाकायचा. एकदा साधे समजून आग्या म्हव त्याने पाडले तेव्हा त्याच्यावरील माश्या त्याच्या पाठीमागे लागल्या तसा तो जीव खाऊन पळत सुटला. पळता पळता दगडाला ठेचकाळत पडला. माश्यांनी तिथेच त्याला गाठले. माश्यांनी दिसेल तिथे त्याच्या शरीराचा चावा घेतला. परंतु त्याने हूँ की चूँ केले नाही. तो धावतच घरी गेला आणि शेजारच्या मुलाला घेऊन डॉक्टरांकडे गेला. त्यांनी त्यांच्या अंगात घुसलेले माश्यांचे काटे काढले तेव्हा त्याला बरे वाटले. अन्यथा त्याच्या अंगाची माश्यांच्या चाव्याने लाही लाही झालेली. तेव्हापासून तो पोळे पाहून अंदाज घेऊन मगच म्हव काढत.

एके दिवशी शंभू जनावरे हिंडवायला गेला होता. जनावरं तळ्याच्या काठी झाडांच्या सावलीत चरत होती. इतर मुले अंघोळ करत असलेली पाहून शंभूही तळ्यात मनसोक्त डुंबून अंग वाळायची वाट पहात बसलेला. तितक्यात तळ्याच्या काठावर असलेल्या झाडावरील पक्ष्यांच्या आवाजाने त्याचे लक्ष वेधले. आंब्याच्या झाडावर चिमण्यांचा चिवचिवाट चाललेला घरट्यातील छोटी, छोटी पिल्लं बाहेर डोकावून पहात होती. चिमणी चोचीतून त्यांना चारा भरवत होती. शंभूला चिमणीची पिल्लं खूप आवडली. त्याने ते घरटे घरी घेऊन जायचे ठरवले. गेल्या वर्षी शाळेत एक पक्षी जखमी होऊन पडलेला तेव्हा तोच सरांच्याकडे त्याला घेऊन गेलेला. सरांनी बिस्किटाचे खोके घेऊन त्याला त्यात ठेवून तांदूळ, डाळ आणि पाणी घातलेले. बरे वाटल्यावर त्याला सोडून दिले होते. त्यामुळे शंभूने ठरवले की ते घरटे घरी घेऊन जायचे. उन्हं उतरतीला जाण्याची तो वाट पाहू लागला. म्हैशी सावलीला रवंथ करत बसलेल्या. त्यांना उठवून तो तळ्यावर घेऊन गेला. दगडाची कप्पर घेऊन त्यांच्या अंगावरचे घासून खरवडून शेण काढले. स्वच्छ पाण्याने धुतले. त्या काळ्या कुळकुळीत दिसू लागल्या. हिंडून त्यांची पोटं तुडुंब भरलेली. शंभूच्या दोन म्हैशी होत्या . शंभूचा त्यांच्यावर खूप जीव होता. शंभूनं हाक मारली की घाबरुन त्या जागेवर उभ्या रहात. लगेच त्याच्याकडे येत. नाही आल्या की शंभू काठीने फोडायचा.त्याचा तसा दरारा‌च होता. म्हैशी पुन्हा चरु लागल्या. यांचं तोंड

कधी गप्प रहायचे नाही म्हणून चिमणी निघून जायची तो वाट पाहू लागला. पिल्लांना भरवून थोड्या वेळाने चिमणी निघून गेली.

पाच वाजायला आले तसे शंभू आंब्याच्या झाडावर चढला. मघाशी पाहिलेल्या पिलांचे घरटे अलगद उचलून काढले. पिलांमुळे घरटे जड लागत होते. घरी जायची वेळ झाल्यावर म्हैशींनी घराचा रस्ता धरलेला. शंभूनं हाक दिली तशा त्या जागेवरच थांबल्या. शंभू त्यांच्यापाशी गेला आणि हैक म्हणाला तशा त्या चालू लागल्या. रस्त्याने येजा-जाणारे शंभूच्या हातातील घरट्याकडे कुतूहलाने पहात होते. शंभू घरी आला. म्हशींचा आवाज ऐकून शंभूच्या आईनं म्हैशी गोठ्यात बांधल्या. शंभूनं हातातील घरट्याकडे पाहिलं. लहानलहान पिल्लं खूप सुंदर होती. त्यानं अवजारांच्या पेटीतून विळा काढला वरील बाजूने घरटे हळूच कापले. दोन पिल्लं हळूच बाहेर आली. शंभूनं घराशेजारच्या दुकानात जाऊन रिकामे खोके आणून त्यात ठेवून त्यांना पाणी ठेवले. पिल्लं भेदरलेल्या अवस्थेत शंभूकडे बघत होती. तेवढ्यात शंभूची आई गोठ्यात म्हैशी बांधून आली. लेकाचा पराक्रम पाहून त्याच्यावर चांगलीच पिसाळली

"शंभू, तुला काय कळतं बिळतं का न्हाय? का म्हणून चिमुकल्यांना आई पस्न तोडून आणलं असशील?"

"हं त्येला काय हुतंय? मी पाळणार हाय पिल्लं, किती मस्त हाईत बग"

"तुला काय अक्कल हाय का? आई बिगार जगतील का ती?"

"का न्हाय जगणार?मला म्हाईत हाय कसं जगवायचं"

"जितनं आणलंयस तितं जाऊन सोडून येजा तिच्या आईचा जीव तळमळत आसंल आईला करामत का कव्वा ? का वनवासी केलंस त्यास्नी? माजं आईक लेका आसा सराप घिवू नगोस, तुला माजी आण हाय बग, जा आदी".

आईनं एवढं कळकळीची विनंती करुनही आईच्या शपथेचा त्याच्यावर काही परिणाम झाला नाही.

"आये तुला काय करायचं? मी पाळणार मजी पाळणार, आजची रात तर ऱ्हावू दे आज ऱ्हाईलीत की कायमचीच पाळायचीत".

"नगो रं असं करु"

"ए आये मला काय बी सांगू नगोस"

आपला मुलगा ऐकत नाही म्हटल्यावर तिला खूप वाईट वाटले. संध्याकाळी त्याचे वडील कामावरून आले. बाहेरच्या खोलीत बिस्किटाचे रिकामे खोके दिसले त्याच्यामध्ये चिवचिव असा आवाज आला तसे ते दचकले

'शंभ्यानं काय आणलंय कुणास ठावूक?' मनाशी ते म्हणाले. त्यांनी बायकोला हाक मारली.

"आगं ही आणि काय पीडा आणलीया?"

" लेकानं चिमणीची पिल्ली आणल्यात, किती समजून सांगीटलं, आणलंस तसं सुडून दे तर त्यो ऐकतूय व्हय? तेन कुटनं आणल्यात बगून तुमीच सुडून या जावा".

" मायला घराकडं दवा दवा करून यायचं आन तुमचं न्हाई ते थॅर"

असे शंभूचं पप्पा म्हणालत. शंभू कुठेतरी बाहेर गेलेला. त्याच्या आईन सगळीकडे फिरून हुडकून आणला.

" शंभू ही काय आणलंयस रं?

"'चिमणीची पिल्लं हाईत, आपुन पाळायचीत?"

"काय डोस्कं फिरलय का तुज? , उजडायच्या आत त्यास्नी सुडून द्यायचं न्हाई तर मला दाखिव आपुन जावून सुडून ईवूया "

"बर पप्पा सकाळी सुडूया की"

"आरं ती आत्ताच कशी मुरगळून पडल्यात बग. भूकंन मरतील सकाळपातूर पार कुमजून जातील. बॅटरी घे, चल मला दाखिव चल, आपुन सुडून ईव "

पप्पा एवढं कळकळीने सांगत आहेत म्हटल्यावर शंभूला त्यांचं म्हणणं पटलं. शंभूनं खोकं अलगद उचलले आणि पप्पांच्या पाठीमागून तो चिमणीचे घरटे होते तिथे पोचला. आपलं घरटं नाहीत, पिल्ली नाहीत बघून चिमणीनं चिवचिवाट करून रडून ओरडून दंगा केलेला. सगळे पक्षी तिच्या दुःखात सामील झालेले. शंभूला खूप वाईट वाटले. त्याने ते खोके झाडावर चढून पहिल्या होत्या त्या जागेवर ठेवले. पिल्लांचा चिवचिवाट ऐकून चिमणी खोक्याजवळ आली आणि पिलांचे पटापट मुके घेऊ लागली. तिथून पुढे शंभूने कुठल्याही पिलांना त्रास द्यायचा नाही की घरी आणायची नाहीत असे मनाशी ठरवले ती स्वतंत्र आहेत तेच बरं आहे आपण त्यांना पकडून घरी नेऊन त्यांच्यावर खूप अन्याय केलाय असे त्याला कळून चुकले.

मुलांनो,

गोष्टी आवडल्या का?

अजून वाचायच्या आहेत का?

आशीच खूप खूप पुस्तकं हवी का?

मग मला फ़ोन कराल ना?

अनिल शिणगारे 7020353347